दैनिक
जनप्रभात
सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज
मुख्य संपादक :- राहुल गजरे
कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे

अनधिकृत बांधकामावर पालिकेचा गजराज

वर्धा : येथील राष्ट्रभाषा मार्गावरील एका अनधिकृत बांधकाम जेसीबीच्या सहाय्याने तोडण्यात आले. ही कारवाई नगरपालिकेच्या नगररचना विभाग व अतिक्रमण हटाव पथकाने संयुक्तपणे केली.

राष्ट्रभाषा रोड भागात बांधकाम नियमांचे उल्लंघन करत पक्के बांधकाम करण्यात आल्याची तक्रार नगरपालिका प्रशासनाला मिळाली होती. त्यानंतर नगरपालिकेच्या नगररचना विभागाच्या अधिकाऱ्यांनी संबंधित बांधकाम मालकास मार्गदर्शक सूचना दिल्या. त्यास नोटीसही बजावली. त्यानंतर सोमवारी १० ऑगस्ट रोजी पालिकेच्या नगर रचना विभागाच्या प्रमुख भाग्यश्री बोरकर, अतिक्रमण हटाव पथकाचे निखील लोहवे आणि पथकाने संबंधित अनधिकृत बांधकाम स्वत्ः गाठून जेसीबीच्या सहाय्याने ते तोडले.

अनधिकृत बांधकामावर पालिकेचा गजराज

*(आष्टी) वर्धा *बुधवार, १२ ऑगस्ट २०२६ *वर्ष ४ थे *अंक २१० *पृष्ठ ६ *मुल्य ५.०० RNI No.: MAHAR/2022/82242

दर्जेदार आरोग्य सुविधा देण्याच्या दिशेने ४०० खाटांचे रुग्णालय महत्त्वाचे पाऊल : ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे

हिंगणघाट येथे ४०० खाटांच्या रुग्णालय इमारतीचे भूमिपूजन आजनसरा देवस्थानला 'ब' वर्गाच्या दर्जासह ५ कोटींचा निधी देणार हिंगणघाट, समुद्रपूर, सेलू पंचायत समिती इमारतीसाठी निधी देणार

वर्धा(जिमाका) : हिंगणघाट मध्ये उभारण्यात येणारे रुग्णालय हे केवळ हिंगणघाट शहरापुरते मर्यादित राहणार नसून परिसरातील ग्रामीण नागरिकांसाठीही आरोग्यसेवेचे महत्त्वाचे केंद्र ठरेल. या रुग्णालयामुळे नागरिकांना उपचारासाठी वर्धा किंवा नागपूरकडे जाण्याची आवश्यकता भासणार नाही. हिंगणघाट्च्या विकासाच्या दृष्टीने ४०० खाटांचे रुग्णालय आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय ही ऐतिहासिक बाब ठरेल. नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा देण्याच्या दिशेने हे रुग्णालय महत्त्वाचे पाऊल असल्याचे प्रतिपादन ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

हिंगणघाट येथे नव्याने बांधण्यात येणाऱ्या ४०० खाटांच्या रुग्णालय इमारतीचे भूमिपूजन ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे, पालकमंत्री डॉ.पंकज भोयर, आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे- बोर्डीकर यांच्याहस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी आमदार समीर कुणावार, नगराध्यक्ष डॉ.नयना तुळसकर जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, हिंगणघाट कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुधीर कोठारी, संजय गाते, आरोग्य उपसंचालक डॉ.शशिकांत शंभरकर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.सुमंत वाघ आदी उपस्थित होते.

पुढे बोलतांना श्री.गोरे म्हणाले, महाराष्ट्राला विकसित, समृद्ध आणि निरोगी बनविण्याचे स्वप्न मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सरकार करण्यासाठी शासन काम करीत आहे. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय असावे आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना डॉक्टर होण्याची संधी मिळावी, यासाठी प्रयत्न सुरू आहेत. त्याचबरोबर सामान्य नागरिकाला उपचाराअभावी त्रास होऊ नये, हा शासनाचा संकल्प आहे. हिंगणघाट मध्ये ४०० खाटांचे रुग्णालय आणि मेडिकल कॉलेज व्हावे, हे आमदार समीर कुणावार यांचे स्वप्न होते. त्यामुळे त्यांच्या प्रयत्नातून साकारत असलेल्या या रुग्णालयाची नोंद हिंगणघाटच्या विकासाच्या इतिहासात निश्चितच होईल, असे ते म्हणाले.

हिंगणघाट परिसराचे श्रद्धास्थान असलेल्या आजनसरा देवस्थानच्या विकासाबाबतही मंत्री गोरे यांनी महत्त्वाची घोषणा केली. सध्या 'क' वर्गाचा दर्जा असलेल्या या देवस्थानला 'ब' वर्गाचा दर्जा देण्यासाठी प्रस्ताव तातडीने पाठविण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. आजनसरा देवस्थानला 'ब' वर्गाचा दर्जा मिळवून देऊ, असे त्यांनी सांगितले. तसेच ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून आजनसरा देवस्थानच्या विकासासाठी ५ कोटी रुपयांचा निधी देण्याची घोषणा ग्रामविकास मंत्री गोरे यांनी केली.

आजच्या काळात नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. केंद्र शासनाच्या आयुष्मान भारत योजनेच्या माध्यमातून पाच लाख रुपयांपर्यंतचे उपचार विनामूल्य उपलब्ध होत आहेत. तसेच महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेच्या माध्यमातूनही गरजू नागरिकांना उपचाराचा लाभ मिळत आहे. त्यामुळे उपचारासाठी नागरिकांना खिशातील पैशांचा विचार करण्याची वेळ कमी झाली आहे. हिंगणघाट, समुद्रपूर आणि सेलू येथील पंचायत समित्यांच्या इमारतींची कामे सुरू आहेत. या कामांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची ग्वाही श्री.गोरे यांनी दिली.

उपचारासाठी नागपूर- वर्ध्याला जाण्याची गरज भासणार नाही : मेघना साकोरे- बोर्डीकर

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील प्रत्येक शेवटच्या घटकापर्यंत मोफत व दर्जेदार आरोग्य सुविधा पोहोचवण्याचे काम सुरू आहे. आयुष्मान भारत आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेच्या माध्यमातून नागरिकांना ५ लाख रुपयांपर्यंतचे मोफत उपचार मिळत आहेत. आमदार समीर कुणावार यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे हिंगणघाटमध्ये मोफत डायलिसिस आणि सिटीस्कॅन सुविधा आधीच सुरू झाली. आता ४०० खाटांचे रुग्णालय आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय उभे राहत असल्याने या भागातील रुग्णांना स्थानिक स्तरावरच चांगल्या आरोग्य सुविधा उपलब्ध होती, असा विश्वास आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी व्यक्त केला.



४०० खाटांचे रुग्णालय हिंगणघाट्च्या विकासातील मैलाचा दगड : डॉ.पंकज भोयर

हिंगणघाट, समुद्रपूर आणि लगतच्या ग्रामीण भागातील सुमारे ३०० गावांचा विचार करता येथे मोठे रुग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालयाची नितांत गरज होती. आमदार समीर कुणावार यांनी स्वतः मंत्रालयाच्या पातळीवर पाठपुरावा करून हा मोठा प्रकल्प मतदारसंघासाठी मंजूर करून आणला. अत्याधुनिक सुविधा असलेले ४०० खाटांचे रुग्णालय हिंगणघाट्च्या विकासातील मैलाचा दगड ठरेल, पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी सांगितले. नागरिकांना आरोग्य योजनांचा पूर्ण लाभ मिळावा यासाठी नगरपरिषदेच्या माध्यमातून शहरी भागात 'आयुष्मान भारत कार्ड' नोंदणीची विशेष मोहीम राबविण्यात येणार असल्याचे पालकमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

हिंगणघाटकरांच्या स्वप्नांची पूर्ती : आ.समीर कुणावार

हिंगणघाटमध्ये ४०० खाटांचे रुग्णालय आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय उभारण्याचे गेल्या २० ते २५ वर्षांपासून पाहिलेले स्वप्न अखेर साकार होत असल्याने हा स्वप्नपूर्तीचा दिवस आहे. हा दिवस हिंगणघाटच्या विकासाच्या इतिहासातील महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. रुग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालय सुरू झाल्यानंतर हिंगणघाटसह समुद्रपूर आणि परिसरातील ग्रामीण नागरिकांना मोठा फायदा होईल.

गंभीर आजारांच्या उपचारासाठी रुग्णांना इतरत्र जाण्याची गरज भासणार नाही, स्थानिक पातळीवरच दर्जेदार उपचार उपलब्ध होतील, असे आमदार कुणावार म्हणाले. यावेळी नगराध्यक्षा डॉ. नयना तुळसकर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.सुमंत वाघ यांनी केले.

४०० खाटांच्या रुग्णालयातील सुविधा

हिंगणघाट येथे आमदार समीर कुणावार यांच्या प्रयत्नाने ४०० खाटांचे रुग्णालय मंजूर झाले आहे. हे रुग्णालय जवळपास ३०,७६६ चौरस मीटर क्षेत्रफळात ३५१ कोटी १० लक्ष रुपये खर्च करुन बांधण्यात येणार आहे.

पर्यावरण पूरक डिझाईन, छतावर सौर पॅनल, तापमान नियंत्रणासाठी जाळीदार रचना, रेन वॉटर हार्वेस्टिंग व मजले निहाय नवीन सुविधा व विभाग असणार आहे.

या चार मजली रुग्णालयामध्ये प्रतीक्षा कक्ष व माहिती केंद्र, आपत्कालीन विभाग, प्रगत निदान केंद्र, रक्तपेढी, विशेष उपचार कक्ष, प्रशासकीय विभाग, शस्त्रक्रिया गृह, तीव्र निगा विभाग, सर्जिकल आयसीयू, हाय डिपेंडन्सी युनिट, मेडिकल आयसीयू, स्त्रीरोग व बालसंगोपन विभाग, लेबर रूम व प्रसूती वॉर्ड, नवजात शिशू निगा विभाग, बालकांची तीव्र निगा विभाग, जनरल वॉर्ड आदी सुविधा राहणार आहे. रुग्णांना अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा एमआरआय, सिटी स्कॅन, डायलासिस, आयसीयू, एनआयसीयू यासारख्या सुविधा उपलब्ध होणार आहे. त्यामुळे नागरिकांना स्थानिक स्तरावरच उपचाराच्या सुविधा उपलब्ध होईल.

पीक विम्याला शेतकऱ्यांचा वाढता प्रतिसाद; १ लाख ७५ हजार ८३८ अर्ज दाखल

१ लाख ८५ हजार ८६७ हेक्टर क्षेत्रावरील पिकांना विम्याचे संरक्षण शेतकऱ्यांनी भरले १ कोटी १३ लाख ६७ हजार रुपये

वर्धा : खरीप हंगामातील पिकांना नैसर्गिक आपत्तीपासून आर्थिक संरक्षण मिळावे, यासाठी प्रधानमंत्री पीक विमा योजनेत जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला आहे. जिल्ह्यात कर्जदार आणि बिगर कर्जदार अशा एकूण १ लाख ७५ हजार ८३८ अर्जांची नोंदणी झाली असून, या माध्यमातून तब्बल १ लाख ८५ हजार ८६७ हेक्टर क्षेत्रावरील पिकांना विमा संरक्षण मिळाले आहे. यासाठी शेतकऱ्यांनी एकत्रित १ कोटी १३ लाख ६७ हजार रुपये विमा हप्ता भरला आहे.

जिल्ह्यातील पीक विमा योजनेत कर्जदार शेतकऱ्यांसह बिगर कर्जदार शेतकऱ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग घेतला. प्राप्त आकडेवारीनुसार ६ हजार ४५२ कर्ज खातेदारांनी पीक विम्यासाठी अर्ज केले आहेत. तर तब्बल १ लाख ६९ हजार ३८६ बिगर कर्जदार खातेदारांनी पीक विमा योजनेत सहभाग घेतला आहे. त्यामुळे यंदाचा हंगामात बिगर कर्जदार शेतकऱ्यांचा सहभाग लक्षणीय असल्याचे दिसून येत आहे.

नैसर्गिक आपत्ती, अतिवृष्टी, अवकाळी पाऊस, पावसातील खंड, कीड व रोगांचा प्रादुर्भाव यामुळे खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची शक्यता असते. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळावा, यासाठी पीक विमा महत्त्वाचा ठरतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी पीक विमा योजनेचा लाभ घेतला आहे.

तालुकानिहाय

आकडेवारीचा विचार करता हिंगणघाट तालुक्यात सर्वाधिक १९ हजार ९८६ शेतकऱ्यांनी पीक विमा योजनेत सहभाग घेतला आहे. त्याखालोखाल देवळी तालुक्यात १३ हजार ७५३, वर्धा तालुक्यात १० हजार ७८४, सेलू तालुक्यात १० हजार ४५३, कारंजा तालुक्यात ८ हजार ४१७, आर्वी तालुक्यात ७ हजार २४७, आष्टी तालुक्यात ४ हजार ९२२ आणि समुद्रपूर तालुक्यात १ हजार ८६६ शेतकऱ्यांनी पीक विमा काढला आहे.

तालुकानिहाय विमा संरक्षित क्षेत्र पाहता हिंगणघाट मध्ये ४२ हजार ३०२.८५ हेक्टर, समुद्रपूरमध्ये ३९ हजार ११७.१५७ हेक्टर, देवळीमध्ये २६ हजार ३८५.३८ हेक्टर, वर्धा तालुक्यात २२ हजार २७४.१० हेक्टर, सेलूमध्ये २० हजार २१८.८३ हेक्टर, कारंजामध्ये १३ हजार २९४.२८ हेक्टर, आर्वीत १४ हजार ८८२.८३ हेक्टर आणि आष्टी तालुक्यात ७ हजार ३९१.७७ हेक्टर क्षेत्र पीक विम्याच्या संरक्षणाखाली आले आहे.

नुकसान झाल्यास विमा संरक्षणाचा आधार

खरीप हंगामात पिकांची जोखीम मोठी असल्याने पीक विमा शेतकऱ्यांसाठी आर्थिक सुरक्षा कवच मानले जाते. पावसाचे असमान वितरण, अतिवृष्टी, पिकांवरील रोग-किडीचा प्रादुर्भाव किंवा अन्य नैसर्गिक संकटामुळे उत्पादनात घट झाल्यास विमा योजनेच्या नियमांनुसार शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळू शकते. त्यामुळे अधिकाधिक शेतकऱ्यांनी वेळेत विमा संरक्षण घेणे आवश्यक आहे.

जिल्ह्यात यंदा १ लाख ८५ हजार ८६७ हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित झाल्याने मोठ्या क्षेत्रातील खरीप पिकांना आर्थिक संरक्षण मिळाले आहे. मात्र, प्रत्यक्ष नुकसान झाल्यास पंचनामे, पीक कापणी प्रयोग आणि नुकसानभरपाईची प्रक्रिया पारदर्शक व जलदगतीने होणे गरजेचे आहे.

अग्रगामी शाळेकडून शाळेच्या बस आणि व्हॅन तपासणी



वर्धा : अग्रगामी कॉन्व्हेंट स्कूल मसाला शाळेच्या परिवहन समिती मार्फत शाळेत चे विद्यार्थी ने-आण करणाऱ्या शाळेच्या बस , व्हॅन आणि इतर वाहनाच्या सुरक्षेची तपासणी करण्यात आली.

दरवर्षी प्रमाणे या ही वर्षी अग्रगामी कॉन्व्हेंट स्कूल मध्ये शासनाने दिलेल्या निर्देशानुसार वाहनांची तपासणी करण्यात आली. दिनांक १० ऑगस्ट २०२६ रोजी शालेय परिवहन समितीच्या अध्यक्षा तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका सिस्टर जेस्सी यांच्या अध्यक्षतेखाली शाळेतल्या विद्यार्थ्यांना ने-आण सगळ्या वाहनाची सुरक्षेची तपासणी करण्यात आली. यामध्ये संकट प्रसंगी वापरण्यात येणारा दरवाजा, प्रथमोपचार, अग्निशामक, वाहने वीस वर्षाच्या आतील असणे आवश्यक, विद्यार्थी संख्या, चालक गणवेश, सीसीटीव्ही कॅमेरा इत्यादी शासनाने दिलेल्या निर्देशानुसार वाहनाची तपासणी करण्यात आली. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका सिस्टर जेस्सी यांनी विद्यार्थ्यांची सुरक्षा ही किती महत्त्वाची आहे तसेच वाहनाची सुरक्षा ही महत्त्वाची आहे या संदर्भात शाळेच्या स्कूल बस आणि व्हॅन चालक-मालक यांना माहिती दिली. शाळेच्या शालेय परिवहन समितीचे सचिव श्री हेमंत सर तसेच समितीचे सदस्य श्री आशिष सर, श्री सुरज सर, श्री मणिराम सर यांची उपस्थिती होती. तसेच मोठ्या संख्येने स्कूल बस व्हॅन यांचे चालक आणि मालक उपस्थित होते.

सर्वसामान्य गरीब नागरिकांना आता वैद्यकीय उपचाराची चिंता नाही : ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे



वर्धा (जिमाका) : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून केंद्र शासन आयुष्मान भारत जनआरोग्य योजना तर राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजना राबविण्यात येत आहे, पुर्वी वैद्यकीय उपचार, शस्त्रक्रियांसाठी आपल्याजवळ किती पैसे आहेत, याचा विचार करावा लागत होता. आता सर्वसामान्य नागरिकांची उपचाराची चिंता जन आरोग्य योजनांमुळे मिटली आहे, असे प्रतिपादन ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

आरोग्य अमृत महोत्सवांतर्गत हिंगणघाट येथे आयोजित महाआरोग्य शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी ग्रामविकास मंत्री श्री.गोरे बोलत होते. कार्यक्रमास पालकमंत्री डॉ.पंकज भोयर, आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, आमदार समीर कुणावर, नगराध्यक्ष डॉ.नयना तुळसकर, जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, जिल्हा पोलिस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, आरोग्य उपसंचालक डॉ.शशिकांत शंभरकर, जिल्हा नियोजन समिती सदस्य संजय गाते, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.सुमंत वाघ, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.स्वप्नील बेले उपस्थित होते.

पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्या संकल्पनेतून गेल्यावर्षी वर्धा जिल्ह्यात मोतीबिंदू विरहित अभियान राबविण्यात आले. पालकमंत्र्यांचा हा स्तुत्य उपक्रम राज्यभर राबविण्यात आला आणि एक लाख नागरिकांची मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आली. मागील वर्षीच्या सेवाभावी वृत्तीतून यावर्षी देखील सर्वसामान्य नागरिकांना चांगल्या आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राबविण्यात येत असलेला आरोग्य

हिंगणघाट येथे दोन दिवशीय महाआरोग्य शिबिराचे उद्घाटन पालकमंत्री व आरोग्य राज्यमंत्र्यांची उपस्थिती

अमृत महोत्सव अत्यंत कौतुकास्पद आहे. मुख्यमंत्र्यांनी माझा वाढदिवस सामाजिक उपक्रमाचे साजरा करावा, असे आवाहन केले होते. वर्धा जिल्ह्यात खऱ्या अर्थाने सामाजिक बांधिलकी म्हणून काम केले जात असल्याचे श्री.गोरे यांनी सांगितले.

वर्धा जिल्ह्यात आयोजित होणाऱ्या या आरोग्य शिबिरात केवळ सामान्य तपासण्याच नाही तर हृदयरोग, कर्करोगाची तपासणी व त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टर सुद्धा उपलब्ध करून दिले. शहरी भागातील रुग्णांना ज्या सुविधा उपलब्ध होतात, तशाच सुविधा आता ग्रामीण भागातही उपलब्ध होत आहे. ज्या रुग्णांना कुटुनही उपचारांसाठी मदत होऊ शकत नाही, अशा रुग्णांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी योजनेतून उपचार दिले जातात. सहायता निधीतून स्थानिक स्तरावरच आर्थिक मदत उपलब्ध होण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात कक्ष स्थापन करण्यात आला असल्याचेही श्री.गोरे म्हणाले.

सर्वसामान्यांच्या सुविधेसाठी आरोग्य अमृत महोत्सव : डॉ.पंकज भोयर

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त गेल्यावर्षी आपण जिल्ह्यात मोतीबिंदू विरहित वर्धा जिल्हा अभियान राबविले. अभियानांतर्गत ६६०८ रुग्णांची विनामूल्य मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आली. अलीकडे विविध प्रकारचे आजार बळावत आहे. उत्तम आरोग्य हीच सर्वात मोठी संपत्ती आहे. त्यामुळे जिल्ह्यातील नागरिकांना स्थानिक स्तरावरच चांगल्या आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी यावर्षी आपण आरोग्य अमृत महोत्सव राबवित आहे. शिबिरात रुग्णांना विविध आजारांचे निदान झाल्यास पुढील उपचार देखील उपलब्ध करुन देऊ, असे पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी सांगितले.

पालकमंत्र्यांची संकल्पना आम्ही राज्यभर राबविली : मेघना साकोरे- बोर्डीकर

पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी गेल्यावर्षी वर्धा जिल्ह्यात मोतीबिंदू विरहित वर्धा जिल्हा हा अभियान राबविण्यात आले. पालकमंत्र्यांचा हा स्तुत्य उपक्रम राज्यभर राबविण्यात आला आणि एक लाख नागरिकांच्या मोतीबिंदू शस्त्रक्रिया केल्या. शेवटच्या घटकातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत आरोग्य सुविधा पोहोचली पाहिजे, याच भावनेतून 'माझे गाव आरोग्य संपन्न गाव' हे अभियान राबविण्यात येत आहे. आमदार समीर कुणावर यांच्या पुढाकाराने हिंगणघाट येथे ४०० खाटांचे रुग्णालय होत आहे. तालुकास्तरावर ४०० खाटांचे रुग्णालय असलेले पाचच तालुके आहेत, हिंगणघाट सहावा तालुका असल्याचे आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांनी केले. पालकमंत्र्यांच्या संकल्पनेतून गेल्यावर्षी मोतीबिंदू विरहित वर्धा अभियान राबविण्यात आले. यावर्षी आरोग्य अमृत महोत्सवांतर्गत चार ठिकाणी महाआरोग्य शिबिर घेण्यात येत असल्याचे श्री.सोमण म्हणाले. सुरुवातीला दीप प्रज्वलित करून शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर आरोग्य तपासणीसाठी लावण्यात आलेल्या दालनांना भेट व पाहणी मान्यवरांनी केली. शिबिरासाठी हिंगणघाटसह समुद्रपूर तालुका व सिंदी रेल्वे परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आरोग्य तपासणीचा लाभ घेतला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते आयुष्मान कार्ड व चष्म्यांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास हिंगणघाट विधानसभा मतदारसंघातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संपादकीय



इतिहासाचे अवजड ओझे!



महाराष्ट्राच्या भूमीला इतिहासाने जितके समृद्ध केले आहे, तितकीच त्या इतिहासाच्या खुणा जपण्याची जबाबदारीही महाराष्ट्रावर टाकली आहे. सह्याद्रीच्या कडेकपारीत उभे असलेले गड-किल्ले, अजिंठा-वेरूळच्या लेण्या, प्राचीन मंदिरे, इतिहासकालीन वाडे, किनारपट्टीवरील जलदुर्ग, जुन्या घाटवाटा, बारवा आणि कोकणातील कातळचित्रे हे केवळ भूतकाळाचे भग्नावशेष नाहीत. त्यांचे अवशेषांच्या रूपात जतन करणे हा वारसा जपण्याचा मार्गदर्शक नाही. कारण, महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय स्मृतींचे ते जिवंत दस्तावेज आहेत. आता मात्र, या दस्तावेजांची पाने हळूहळू जीर्ण होत आहेत आणि त्याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. महाराष्ट्राच्या गड-किल्ल्यांना, ऐतिहासिक स्थळांना जागतिक मान्यता मिळत असताना त्यांच्या संवर्धनाची जबाबदारी अधिकच वाढली आहे. दगडादगडातून इतिहास सांगणाऱ्या या वास्तूकडे केवळ पर्यटनाच्या चौकटीत न पाहता शास्त्रीय संवर्धन, सातत्यपूर्ण देखभाल आणि स्थानिक समाजाच्या सहभागाची गरज आहे.

महाराष्ट्राच्या किल्ल्यांना अलिकडे जागतिक पातळीवर मोठी मान्यता मिळाली. अनेक वारसा वास्तूंचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश झाला, तेव्हा उभ्या महाराष्ट्राने अक्षरशः आनंदोत्सव साजरा केला. पण हा दर्जा सातत्यपूर्ण नससतो. तो टिकवून टेवण्यासाठी या स्थळांचे निगुतीने जतन करावे लागते. त्यामुळे, ज्या अभिमानास्पद वारशाला जगाने मान्यता दिली, त्याचे जतन आपण किती गांभीर्याने करतो याचा विचार सतत करत राहावा लागेल. हजारो वर्षांच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचा सचिव आणि जिवंत वारसा म्हणून ज्याकडे पाहिले जाते, त्या अजिंठा लेण्यातील अनेक गुंफा आज अस्तित्वाचा संघर्ष करत आहेत. हजारो वर्षे पाऊसपाणी आणि अनुकूल प्रतिकूल वातावरणाशी जुळवून घेत तेथील प्राचीन चित्रकलेचा उत्कृष्ट वारसा जिवंत राहण्याचा संघर्ष करत आहे. अशा अनेक वारसा स्थळांचा इतिहास आता केवळ महाराष्ट्राचा किंवा भारताचा विषय राहिलेला नाही. ही केवळ जागतिक पर्यटकांची आकर्षण केंद्रेही नाहीत, तरती जागतिक वारशाचा भाग आहेत. त्यामुळे, तो वारसा जपण्याची जबाबदारी केवळ आपल्या संस्कृतीने नव्हे, तर संपूर्ण जगाने आपल्या खांद्यावर सोपविली आहे, याची जाणीव जिवंत राहावयास हवी. अजिंठा लेण्यातील अनेक पुरातन चित्रे आज पावसाच्या गळतीपुढे अस्तित्वाच्या उंबरठ्यावर उभी राहिल्याची भीती व्यक्त होत असल्याने, एकूणच, संस्कृती आणि वारशाचा उदोउदो करत इतिहासाचे अभिमानास्पद पोवाडे गाणाऱ्या महाराष्ट्राच्या कसोटीचा काळ सुरू झाला आहे. वारसा स्थळांची दुरवस्था ही महाराष्ट्रासाठी नवी बाब नाही. किल्ल्यांच्या तटबंदीवर वाढलेली झाडे, बारावादळाने वा पावसाने ढासळलेल्या भिंती, मोडकळीस आलेले दरवाजे, दुर्लक्षित पाण्याच्या टाक्या, अस्वच्छ परिसर, ऐतिहासिक वास्तूंच्या भिंतींवरील आधुनिक प्रतिभादर्शन, प्रदूषणकारी प्लास्टिकचा कचरा आणि अतिक्रमणांचा वेनाशकारी विळखा हे चित्र अनेक ठिकाणी दिसते. काही ऐतिहासिक ठिकाणी पर्यटकांची गर्दी वाढते आहे; पण त्या तुलनेत सुविधांचा विकास झालेला नाही. पर्यटक वाढणे ही चांगली गोष्ट आहे; पण त्या पर्यटकांच्या गर्दीमुळे स्थळाचीच झीज होत असेल तर पर्यटनाचा अर्थ नव्याने विचारात घ्यावा लागेल. मुळात, ऐतिहासिक स्थळांचे जतन करण्याबाबतच्या समजुतीतच काही संभ्रम दिसतो, हे वास्तव लक्षात घ्यावयास हवे. आज 'संवर्धना'च्या नावाखाली जे काही केले जाते, ते प्रत्यक्षात केवळ 'सुशोभीकरण' वाटावे अशीच स्थिती दिसते. ऐतिहासिक वास्तूंवर सिमेंटचे थर चढविणे, नव्या फरशा बसविणे, रंगरंगोटी करणे यांसारख्या पद्धतीमुळे वास्तूच्या मूळ रचनेचे आणि त्यातील सूक्ष्म तपशिलांचे मोठे नुकसान होत आहे. अनेक ठिकाणी केवळ पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी ऐतिहासिक वास्तूंवर रंगीबेरंगी दिवे लावले जातात, ही बाब तर अधिकच चिंताजनक आहे. अशा प्रकारांमुळे वास्तूच्या मूळ स्वरूपाचे गांभीर्य हरवते आणि त्या केवळ 'देखावा' बनून राहतात.

अजिंठा लेण्यासारखी अवस्था पाहता, आता केवळ 'वारसा वास्तू वाचवा' एवढ्या भावनिक घोषणा पुरेशा नाहीत. आता वारसा व्यवस्थापनाची व्यापक संकल्पना स्वीकारणे गरजेचे आहे. कारण, त्या परिसराचे सांस्कृतिक जीवन हादेखील त्या वारशाचा अविभाज्य भाग असतो. इतिहासाची पुनरावृत्ती करता येणार नसेल, तर इतिहासाचे जतन तरी करावेच लागेल. त्यामध्ये कोणतीही कसूर झाली तर ती इतिहासाशी प्रतारणा ठरते. आपण अमाप उत्साहात वारशाचे उत्सव साजरे करतो, गडकोटांवर सोहळे साजरे करतो, ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वांच्या स्मृती जागवतो, भव्य कार्यक्रम करतो, पण ते सोहळे संपल्यानंतर त्या वास्तू पुन्हा अस्तित्वाचा संघर्ष करत राहतात. त्या संघर्षात त्यांना प्रामाणिक साथ दिली नाही, तर इतिहासाचे उदात्तीकरण होत असतानाही, इतिहासाचे प्रत्यक्ष पुरावे मात्र ढासळत राहतील. त्यामुळे वारशाचे 'राजकारण' न होता 'व्यवस्थापन' हवे. सुशोभीकरण न करता, शास्त्रीय संवर्धन हवे आणि त्यासाठी केवळ सरकारकडे बोटे न दाखवता सामाजिक सहभागाचे भानही हवे. विकासाच्या वेगात वारसा चिरडला जाऊ नये आणि वारशाच्या नावाखाली विकास रोखलाही जाऊ नये.**maharashtras heritage** दोन्हींचा समतोल साधणे हेच खरे आव्हान आहे. 'विकास भी, विरासत भी' हा आधुनिक भारताचा दृष्टिकोण आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०२४ मध्ये जागतिक वारसा समितीच्या अधिवेशनाच्या उद्घाटनप्रसंगी सांगितले होते. २०२६ मध्येही या संकल्पनेचा पुनरुच्चार झाला. विकास हवा, आधुनिक पायाभूत सुविधा हव्यात, महामार्ग हवेत, रेल्वे, विमानतळ, शहरे, उद्योग आणि रोजगार हवा; पण हे सर्व उभारताना हजारो वर्षांच्या इतिहासाच्या खुणा नष्ट होता कामा नयेत, एवढेच या संकल्पनेचे साधे तत्त्व आहे. विकास आणि वारसा हे परस्परविरोधी आहेत, अशी धारणा काही दशकांपूर्वी अधिक प्रबळ होती. आज जगातील अनेक देश या धारणेतून बाहेर पडत आहेत. आधुनिकता आणि इतिहास एकत्र नांदू शकतात, हे अनेक उदाहरणांनी सिद्ध केले आहे.

समाज आणि देशाचे प्रचंड शक्तिस्थान- युवा!

जागतिक युवा दिन विशेष.



युवा हे समाजाचे शक्तिस्थान आहेत आणि त्यांच्या विकासासाठी आणि सक्षमीकरणासाठी आपण सर्वांनी एकत्र येणे आवश्यक आहे. जागतिक युवा दिन हा त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांच्या योगदानाची ओळख पटवून देण्यासाठी एक महत्त्वपूर्ण संधी आहे. त्यामुळे या दिवसाचे महत्त्व ओळखून त्याचे योग्य प्रकारे पालन करणे आवश्यक आहे. श्रीकृष्णदास निरंकारी उर्फ बापू यांचा सदर मार्गदर्शक लेख अभ्यासुया... संपादक.

जागतिक युवा दिन दरवर्षी १२ ऑगस्ट रोजी साजरा केला जातो. हा दिवस तरुणांच्या भूमिका, त्यांचे महत्त्व, आणि त्यांच्या समस्यांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी साजरा केला जातो. युवा हे समाजाचा भविष्य आहेत आणि त्यांच्यातील सामर्थ्य, जोश, आणि कल्पकता हे समाजच्या प्रगतीसाठी अत्यंत आवश्यक आहेत. जागतिक युवा दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. यात कार्यशाळा, चर्चासत्रे, सांस्कृतिक कार्यक्रम आणि युवा नेतृत्व विकास कार्यक्रमांचा समावेश असतो. या उपक्रमांद्वारे तरुणांना त्यांचे अधिकार, जबाबदाऱ्या, आणि समाजातील त्यांच्या भूमिकेची जाणीव करून दिली जाते. या दिनानिमित्त तरुणांच्या समस्यांवर चर्चा केली जाते. शिक्षण, रोजगार, मानसिक आरोग्य, आणि सामाजिक न्याय यांसारख्या विषयांवर लक्ष केंद्रित केले जाते. तसेच, तरुणांच्या आवाजाला महत्त्व देऊन त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्याचे प्रयत्न केले जातात.

भारतात दरवर्षी १२ जानेवारीला राष्ट्रीय युवा दिन साजरा केला जातो. हा दिवस स्वामी विवेकानंद यांच्या जन्मदिनाला समर्पित आहे. स्वामी विवेकानंद यांचा जन्म दि.१२ जानेवारी १८६३ रोजी कोलकाता येथे झाला. भारतात राष्ट्रीय युवा दिन साजरा करण्याची सुरुवात सन १९८५मध्ये झाली. तेव्हापासून आजपर्यंत दरवर्षी १२ जानेवारी हा दिवस युवा दिन म्हणून साजरा केला जातो. स्वामी विवेकानंद हे केवळ भारतातच नव्हे तर जगभर त्यांच्या विचार आणि आदर्शांसाठी प्रसिद्ध होते. लहान वयातच त्यांनी आपल्या कल्पनांनी जगभरात स्वतःची वेगळी प्रतिमा आणि ओळख निर्माण केली होती. त्यांनी नेहमीच तरुणांना त्यांच्या विचारांनी प्रेरित केले, म्हणूनच त्यांची जयंती युवा दिन म्हणून साजरी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

सन १९८४साली संयुक्त राष्ट्र संघाने ते वर्ष आंतरराष्ट्रीय युवा वर्ष म्हणून घोषित केले. त्यानंतर भारत सरकारने याबर विचार केला आणि तेव्हापासूनच दरवर्षी स्वामी विवेकानंदांच्या जयंती १२ जानेवारीला राष्ट्रीय युवा दिन साजरा करण्याचा निर्णय घेतला. सन १९८५मध्ये देशात प्रथमच राष्ट्रीय युवा दिन साजरा करण्यात आला.

महत्त्व आणि उद्देश्य- कोणत्याही देशाचा उत्तम विकास त्या देशातील तरुणांवर अवलंबून असतो. भारत हा तरुण लोकसंख्या असलेला देश आहे आणि देशाची प्रगती तरुणांवर अवलंबून आहे. त्यामुळे देशातील तरुणांना योग्य मार्गदर्शनासाठी हा दिवस साजरा केला जातो. विवेकानंदांच्या जयंतीनिमित्त युवा दिन साजरा करण्यामागचा उद्देश हा आहे की, युवकांनी विवेकानंदांच्या विचारांनी प्रेरित होऊन देशाच्या प्रगतीत हातभार लावावा. देशात राष्ट्रीय युवा दिनाच्या दिवशी सर्व शाळा आणि महाविद्यालयांमध्ये थीमसह स्पर्धा आयोजित केल्या जातात. याशिवाय मुले भाषणातून स्वामी विवेकानंदांचे अनमोल विचार सांगतात.

आंतरराष्ट्रीय स्तरावर १२ ऑगस्ट हा दिवस आंतरराष्ट्रीय युवा दिन म्हणून साजरा केला जातो. दरवर्षी यानिमित्ताने युवकांशी निगडीत विशिष्ट पैलूवर चर्चा घडवून आणली जाते. यावर्षी 'शांती स्थापनेत युवकांचा सहभाग- युव बिल्डींगपीस' हे घोषवाक्यनिश्चित करण्यात आले आहे. सृजनशील अशा युवा शक्तीच्या माध्यमातून जगभरात शांततेची स्थापना व्हावी हा यामागचा विचार आहे. संयुक्त राष्ट्रांनी १९८५मध्ये पहिले आंतरराष्ट्रीय युवा वर्ष साजरे केले. या घटनेच्या दहाव्या वर्धापन दिनानिमित्त १९९५मध्ये जगातील युवावर्गाच्या स्थितीत अनुकूल बदल घडवून आणण्यासाठी 'वर्ल्ड प्रोग्राम ऑफ ?क्शन फॉर युथ' स्वीकारण्यात येऊन त्या माध्यमातून मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यात आली. या कार्यक्रमाच्या माध्यमातून संयुक्त राष्ट्र महासभेने शिक्षण, रोजगार, गरिबी, आरोग्य, पर्यावरण, सहभाग, जागतिकीकरण, युवक आणि संघर्ष, एचआयव्ही एड्स आदी १५ क्षेत्रांची निवड प्राध्यान्याने केली. युवकांना मिळणाऱ्या संधींची संख्या वाढवी, त्यांची गुणवत्ता वाढविणे आणि त्या माध्यमातून समाजासाठी युवकांचे योगदान वाढविणे यादिशेने या कार्यक्रमाद्वारे चांगले प्रयत्न झाले आहेत. लिस्बन येथे ८ ते १२ ऑगस्ट १९९८ दरम्यान पार पडलेल्या युवकांशी निगडीत मंत्र्यांच्या आंतराष्ट्रीय परिषदेत १२ ऑगस्ट रोजी आंतरराष्ट्रीय युवा दिन साजरा करण्याची शिफारस करण्यात आली आणि त्यावर १७ डिसेंबर १९९९ रोजी संयुक्त राष्ट्र महासभेने शिक्कामोर्तब केले. तेव्हापासून हा दिवस युवा दिन म्हणून जगभरात साजरा करण्यात येतो.

सुरक्षा परिषदेने आपल्या २०१५ आणि २०१६च्या ठरावात शांतीस्थापनेच्या प्रयत्नांना यश येण्यासाठी युवकांची भूमीका महत्त्वाची असल्याचे नमूद करण्यात आले आहे. सामाजिक न्याय आणि शांतीस्थापनेच्या अशाच प्रयत्नांना यथपैकी युवा दिनाच्या माध्यमातून अधोरेखित करण्यात आले आहे. युवक हा समाजात बदल घडवून आणण्यासाठी महत्त्वाचा घटक आहे. युवकांना नागरिकांचे अधिकार, सामाजिक न्याय आणि विश्वशांतीच्या महत्त्वाबाबत जागरूक केले तर जगात विविध पातळ्यांवर असणारे संघर्ष, वाद कमी होऊ शकतील. अशा अनुकूल बदलासाठी युवावर्ग निश्चितपणे पुढे येईल. जनसामान्यांच्या प्रगतीसाठी जागतिक शांततेचे महत्त्व लक्षात घेता शांतता प्रस्थापित करण्यात युवकांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. आजचा युवक ज्ञान आणि विज्ञानाच्या विश्वात वावरणारा आहे. मानवी मुल्ये आणि मानवी विकासाबाबत त्याला चांगली जाण आहे. विज्ञान- तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जगातील अनेक समस्यांची उत्तरे शोधण्याची क्षमता त्याच्यात आहे. याशक्तीचा उपयोग तो जगात शांतता प्रस्थापित करण्यासाठी निश्चितपणे करू शकतो. जागतिक युवा दिनाच्या निमित्ताने या भूमिकेबाबत चर्चा होणे आणि त्यादिशेने युवकांचा सहभाग वाढणे तेवढेच महत्त्वाचे आहे. विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी!

!! आंतरराष्ट्रीय युवा दिनाच्या समस्त युवक मित्रांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

- संकलन व शब्दांकन -
तुमचा हीतेषी मित्र:
श्रीकृष्णदास निरंकारी उर्फ बापू.
प. पू. गुरुदेव हरदेव कृपानिवास.
मु.एकता चौक,
रामनगर, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सप-
९४२३७१४८८३..

आव्हान समान ऊर्जावाटपाचे

आज भारताकडे ऊर्जा क्षेत्रात जगाला मार्गदर्शन करण्याची क्षमता आहे; मात्र देशातील प्रत्येक घर, शेत, शाळा आणि रुग्णालयाला समान गुणवत्तेची वीज मिळेल तेव्हाच त्या नेतृत्वाला खरी प्रतिष्ठा मिळेल. ऊर्जा सुरक्षा हा प्रवासाचा पहिला टप्पा होता. आता ऊर्जा न्याय हेच भारताच्या विकासाचे पुढील ध्येय असले पाहिजे. कारण विजेचा प्रकाश केवळ बल्ब नाही, तर समाजातील संधी, समानता आणि विकासाची नवी दिशा उजळवतो.

भारताने गेल्या दशकभरात ऊर्जा क्षेत्रात केलेली प्रगती जगासाठी अभ्यासाचा विषय ठरली आहे. एके काळी वीजटंचाई, भारनियमन आणि अपुऱ्या उत्पादनामुळे ओळखला जाणारा भारत आज जगातील सर्वाधिक वेगाने ऊर्जा क्षमता वाढवणाऱ्या देशांमध्ये गणला जातो. कोळशावर आधारित प्रकल्पांबरोबरच सौर, पवन, जल आणि अणुऊर्जा या क्षेत्रांमध्ये मोठी गुंतवणूक झाली आहे. देशाची एकूण स्थापित वीजनिर्मिती क्षमता दुपटीहून अधिक वाढली आहे. राष्ट्रीय वीजग्रीडची क्षमता विस्तारली आहे. नवीकरणीय ऊर्जेतील भारताची झेप जागतिक पातळीवर कौतुकास्पद मानली जात आहे; मात्र या सर्व यशामागे एक मूलभूत प्रश्न आजही अनुत्तरित आहे, तो म्हणजे देशात पुरेशी वीज निर्माण होत असली, तरी प्रत्येक नागरिकापर्यंत समान गुणवत्तेने ती पोहोचते का? हा प्रश्न केवळ तांत्रिक नाही, तर सामाजिक, आर्थिक आणि लोकशाही मूल्यांशी संबंधित आहे. कारण ऊर्जा म्हणजे केवळ उद्योगधंद्यांचे ईंधन नाही, तर ती शिक्षण, आरोग्य, शेती, रोजगार आणि सन्मानपूर्वक जगण्याचा पाया आहे. त्यामुळे भारताच्या ऊर्जाधोरणाचा पुढील टप्पा केवळ 'ऊर्जा सुरक्षा' नसून 'ऊर्जा न्याय' असला पाहिजे. गेल्या दहा वर्षांमध्ये केंद्र सरकारने ऊर्जा क्षेत्रात मोठी गुंतवणूक केली. ग्रामीण विद्युतीकरणाला गती मिळाली.

घराघरांमध्ये वीज जोडणी देण्याची मोहीम राबवण्यात आली.(Solar-powered) विशेष भर देण्यात आला. आज देशाची एकूण वीजनिर्मिती क्षमता ५२० गीगावॉटपेक्षा अधिक झाली आहे. त्यापैकी निम्म्याहून अधिक क्षमता जीवाश्म ईंधनाव्यतिरिक्तच्या स्रोतांमधून उपलब्ध होत आहे.भारताने हवामानबदलाच्या पार्श्वभूमीवर हरित ऊर्जेच्या दिशेने महत्त्वपूर्ण वाटचाल केली आहे. त्यामुळे ऊर्जा संक्रमणाच्या जागतिक चर्चेत भारताचे स्थान अधिक मजबूत झाले आहे; मात्र राष्ट्रीय पातळीवरील ही प्रगती प्रत्येक गावात, प्रत्येक शेतात आणि प्रत्येक घरात सारखीच अनुभवाला येते, असे म्हणता येणार नाही. अनेक दुर्गम आदिवासी भाग, डोंगराळ प्रदेश आणि सीमावर्ती गावे आजही खंडित वीजपुरवठ्याच्या समस्येला सामोरे जात आहेत. शहरात रोहित्र बिघडल्यास काही तासांमध्ये दुरुस्ती होते; परंतु ग्रामीण भागात अनेकदा दोन-दोन दिवस वीजपुरवठा खंडित राहतो. शेतीपंपांसाठी रात्रीच्या वेळी वीज दिली जाते. त्यामुळे शेतकऱ्यांना रात्रभर जागून पाणी द्यावे लागते. अनेक गावांमध्ये कमी दाबामुळे मोटारी चालत नाहीत. याचा थेट परिणाम शेतीच्या उत्पादकतेवर होतो. देशात शंभर टक्के घरांना वीजजोडणी मिळाल्याचा दावा केला जातो;

आजीवन ..

अटकपूर्व जामीन
आ जीवन मिळवा
गुन्हा काही करता
होऊनकात हळवा

पोलिसी धर पकड
सीमापार रे पळवा
अटककरणा- यांना
तिसरी कडे वळवा

कायदेशीर मेहमान
यंत्रणेसोबत जुळवा
कोणलाये हात मले
सर्वां असूये जळवा

पंचआपल्याबाजूने
प्रतिपक्षाले लोळवा
खाचाखोचा जाणते
कायद्यांमध्येघोळवा

पोलिसस्थाच्यां मस्त
बा जंगं जंग छळवा
सापडत ना आरोपी
सूरतेचं तसे आळवा

योग्य त्या विभागाशी
चांगले संधान जुळवा
धाड पाडणार असेलं
आधी आम्हां कळवा

कायद्याच्या जंजाळा
खात्याला बा घोळवा
मिडियामाइयाबाजूने
सावलीनेउन्हे पोळवा

हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६..

सुनावणी ...

गोगलगाय पाय
चालते सुनावणी
म्हणतात सगळे
केवळ बतावणी

कागदी गोतावळे
विसरली लेखणी
कार्यक्रम रुपरेषा
नाही ती आखणी

यंत्रणा उगा अशी
बांधलेली दावणी
कधी येणार पीक
चालू राहे लावणी

वेळेचे बंधन नाही
परिक्षा जीव घेणी
दोन्ही सैन्य सज्ज
कंटाळी रणांगणी

नवीन कर्ज डोक्यां
जुनी संपेना देणी
निकाल द्या त्वरित
होऊ आपले ऋणी

आपसात समटे हो
समजुतीने वाटणी
निकालाच्या आधी
देऊटाके कलाटणी

होऊदे एकदाचे ते
संपवा ताणा ताणी
सोक्ष मोक्ष लागावा
दूध दूध पाणीपाणी

- हेमंत मुसरीफ, पुणे
९७३०३०६९९६

डिजिटल आर्थिक क्रांतीतील नवे पर्व

अलीकडेच भारताने डिजिटल क्रांतीच्या प्रक्रियेमध्ये एक एतिहासिक पाऊल टाकले. आता एटीएममधून पैसे काढण्यासाठी प्लास्टिक कार्डची गरज उरलेली नाही. मोबाईल आणि यूपीआयच्या साहाय्याने कार्डशिवाय थेट एटीएममधून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. ही सुविधा म्हणजे केवळ तांत्रिक सुधारणा नसून भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे.

भारतातील बँकिंग आणि आर्थिक व्यवहारांची पद्धत गेल्या दशकात आमूलाग्र बदलली आहे. एके काळी बँकेच्या शाखेत जाऊन पैसे काढण्यासाठी तासनतास रांगेत उभे रहावे लागायचे. त्यानंतर एटीएम यंत्रणा आली आणि ग्राहकांच्या आयुष्यात मोठी सोय निर्माण झाली. मात्र तंत्रज्ञानाची वाटचाल येथेच थांबली नाही. भारताने आणखी एक ऐतिहासिक पाऊल टाकले आहे. आता एटीएममधून पैसे काढण्यासाठी प्लास्टिक कार्डची गरज उरलेली नाही. मोबाईल आणि यूपीआयच्या साहाय्याने कार्डशिवाय थेट एटीएममधून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. ही सुविधा म्हणजे केवळ तांत्रिक सुधारणा नसून भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. भारताने जगाला यूपीआयच्या माध्यमातून डिजिटल व्यवहारांचे एक अद्वितीय मॉडेल दिले. यूपीआयने अगदी चहाच्या टपरीपासून मोठ्या शॉपिंग मॉलपर्यंत सर्वत्र व्यवहारांची पद्धत बदलून टाकली. आता त्याच यूपीआयचा वापर करून एटीएममधून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे बँकिंग क्षेत्र अधिक सुरक्षित, सुलभ आणि सर्वसमावेशक बनले आहे. कार्डलेस एटीएम म्हणजे अशी यंत्रणा ज्यामध्ये ग्राहकाला पैसे काढण्यासाठी एटीएम कार्ड मशीनमध्ये टाकावे लागत नाही. ग्राहक आपल्या मोबाईलवरील यूपीआय अनुप्रयोगाचा वापर करून एटीएमशी संवाद साधतो आणि काही सेकंदांमध्ये रोख रक्कम प्राप्त करतो. या प्रक्रियेमुळे कार्ड बाळगण्याची गरज संपते आणि अनेक प्रकारच्या फसवणुकीपासून संरक्षण मिळते.



या सुविधेची कार्यपद्धती अत्यंत सोपी आहे. ग्राहक एटीएमच्या पडद्यावर रोख रक्कम काढण्याचा पर्याय निवडतो. त्यानंतर आवश्यक रक्कम नमूद करतो. एटीएम मशीन लगेच एक विशेष क्यूआर कोड तयार करते. ग्राहक आपल्या मोबाईलमधील यूपीआय ?प्स उघडून हा कोड स्कॅन करतो. त्यानंतर यूपीआय पासवर्ड टाकून व्यवहाराला मंजुरी देतो. काही क्षणांमध्ये एटीएममधून रोख रक्कम बाहेर येते. संपूर्ण प्रक्रियेत कार्डचा वापर होत नाही आणि कोणत्याही अतिरिक्त उपकरणाची आवश्यकता रहात नाही. सामान्य नागरिकांसाठी ही सुविधा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. अनेकदा आपण एटीएम कार्ड घरी विसरतो किंवा ते पाकिटासह हरवते. अशा वेळी अचानक पैशांची गरज भासल्यास मोठी अडचण निर्माण होते. कार्डलेस एटीएममुळे ही समस्या पूर्णपणे दूर होते. आज बहुतांश लोकांकडे स्मार्टफोन असतो आणि त्यावर यूपीआय ?प्स सक्रिय असतो. त्यामुळे केवळ मोबाईलच्या सहाय्याने पैसे काढणे शक्य होते. सायबर गुन्हेगारीच्या वाढत्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर ही सुविधा अधिक महत्त्वाची ठरते. गेल्या काही वर्षांमध्ये एटीएम स्किमिंग, कार्ड क्लोनिंग आणि डेटा चोरीच्या घटना मोठ्या प्रमाणात वाढल्या होत्या. काही गुन्हेगार एटीएममध्ये गुप्त उपकरणे बसवून कार्डची माहिती चोरत आणि त्याद्वारे बनावट कार्ड तयार करत. परिणामी ग्राहकांच्या खात्यातील पैसे लुटले जात. कार्डलेस व्यवहारांमध्ये कार्डच बापरले जात नसल्यामुळे अशा प्रकारच्या गुन्ह्यांना मोठ्या प्रमाणात आळा बसतो. त्यामुळे ग्राहकांचा विश्वास वाढतो आणि बँकिंग व्यवहार अधिक सुरक्षित बनतात..

आज देशातील लाखो नागरिक यूपीआयचा वापर करतात; परंतु अनेकांकडे एटीएम कार्ड नसते किंवा त्याचा वापर करण्याची सवय नसते. मोबाईलच्या माध्यमातून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे डिजिटल व्यवहार आणि पारंपरिक रोख व्यवहार यांच्यातील दरी कमी होते. ग्रामीण भागातील नागरिक अधिक आत्मविश्वासाने बँकिंग सेवांचा वापर करू शकतात. ज्येष्ठ नागरिकांसाठीही कार्डलेस एटीएम वरदान ठरू शकते. अनेकदा वयोमानानुसार एटीएम कार्ड हाताळणे, कार्डचा पासवर्ड लक्षात ठेवणे किंवा मशीनमध्ये कार्ड योग्य प्रकारे बापरणे कठीण जाते. मोबाईलवरील परिचित यूपीआय ?प्स बापरून व्यवहार करणे तुलनेने सोपे वाटू शकते. योग्य मार्गदर्शन मिळाल्यास ज्येष्ठ नागरिकांना या सुविधेचा मोठा लाभ होऊ शकतो. एकापेक्षा जास्त बँक खाती असलेल्या ग्राहकांसाठी ही सुविधा आणखी उपयुक्त आहे. पूर्वी वेगवेगळ्या खात्यांसाठी अनेक कार्ड सांभाळावी लागत. आता एकाच यूपीआय अनुप्रयोगामध्ये विविध खाती जोडलेली असल्यास आवश्यकत्या खात्यातून थेट पैसे काढता येतात.

विशेष म्हणजे भारताने या क्षेत्रात जगासमोर एक वेगळे उदाहरण निर्माण केले आहे. अनेक विकसित देशांमध्ये कार्डशिवाय पैसे काढण्याच्या सुविधा उपलब्ध असल्या तरी त्या बहुधा विशिष्ट बँकेपुरत्या मर्यादित असतात. भारताने मात्र सर्व बँका, सर्व यूपीआय ?प्स आणि सर्वसामान्य नागरिक यांना जोडणारी एक सार्वत्रिक आणि परस्परसंवादी व्यवस्था विकसित केली आहे. त्यामुळे कोणत्याही बँकेचा ग्राहक कोणत्याही सक्षम एटीएमवर जाऊन यूपीआयच्या साहाय्याने पैसे काढू शकतो. ही संकल्पना जागतिक स्तरावर अत्यंत अभिनव मानली जाते. डिजिटल भारत मोहिमेला या सुविधेमुळे मोठी चालना मिळाली आहे. डिजिटल व्यवहारांमध्ये भारताने आधीच जागतिक नेतृत्व प्राप्त केले आहे. यूपीआय व्यवहारांची संख्या आणि त्याचा व्यापक वापर पाहता अनेक देश भारताच्या अनुभवातून शिकण्याचा प्रयत्न करत आहेत. कार्डलेस एटीएम ही त्याच यशस्वी प्रवासातील पुढची पायरी आहे. आर्थिक सर्वसमावेशकतेच्या दृष्टीनेही या सुविधेचे महत्त्व मोठे आहे. बँकिंग सेवा त्रिकोण नागरिकापर्यंत पोहोचवणे हे कोणत्याही विकसित अर्थव्यवस्थेचे ध्येय असते. डिजिटल साधनांच्या मदतीने नागरिकांना आधिक सक्षम करणे आणि त्यांना वित्तीय प्रणालीशी जोडणे हे या तंत्रज्ञानामुळे अधिक सुलभ झाले आहे. गावातील शेतकरी, छोटा व्यापारी, विद्यार्थी, गृहिणी किंवा ज्येष्ठ नागरिक प्रत्येकाला याचा थेट लाभ होऊ शकतो. भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता, आवाजावर आधारित सेवा आणि प्रादेशिक भाषांमधील संवाद यांचा यापर वाढल्यास कार्डलेस एटीएम आणखी लोकाभिमुख होतील.

जनप्रभात हे दैनिक जनप्रभात हे दैनिक पत्र मालक,प्रकाशक,मुद्रक :संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर्स, नवीन आष्टा, ता. आष्टी, जि.वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता. आष्टी, जि.वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९(या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNINO : MAHMAR/2022/82242

देशव्यापी जेल भरो आंदोलनाला पाठींबा म्हणून घोडेगाव तहसील कार्यालय येथे जोरदार निदर्शने

महंमद मुलाणी / आंबेगाव

देशभरात,१०ऑगस्ट २०२६ रोजी शेतकरी आणि कामगारांच्या प्रश्नांवर जेलभरो आंदोलन, अखिल भारतीय किसान सभा व सिटू कामगार संघटना यांच्या नेतृत्वाखाली होत आहे.

या आंदोलनाला पाठींबा म्हणून घोडेगाव तहसील कार्यालय समोर, १० ऑगस्ट रोजी, निदर्शने,किसान सभा आंबेगाव तालुका समितीच्या वतीने करण्यात आले.

यावेळी संघटनेचे निवेदन नायब तहसीलदार श्री. सचिन बाघ यांनी स्वीकारले.व संघटनेच्या शिष्टमंडळासोबत संघटनेच्या मागण्यावाबत चर्चा करून प्रश्न सोडवणुकीचे आश्वासन देण्यात आले.

नियमित कर्जदार यांना दोन लाखाचा दिलासा द्यावा.,हिरड्याला हमीभाव जाहीर करावा, पुणे-नाशिक मूळ रेल्वे मार्गे झाला पाहिजे, पेसा मोबिलाईझर यांचे पद कायम स्वरूपी करून त्यांच्या मानधनात वाढ करा,दुध भेसळखोर यांचेवर कडक कारवाई करा, या राज्य व केंद्र शासनाशी संबंधित मागण्या असल्याने संघटनेच्या मागण्यांचे निवेदन तत्काळ जिल्हास्तरावर



पाठवून या मागण्या राज्यशासनाकडे पाठवल्या जातील असे आश्वासन यावेळी संघटनेच्या शिष्टमंडळास देण्यात आले. आंबेगाव तालुक्यातील पुनर्वसनाचे प्रश्न विषयक चर्चा होवून त्याविषयीचे लेखी उत्तर किसान सभेस दिले जाईल असे यावेळी मा.नायब तहसीलदार यांनी नमूद केले.आदिवासी क्षेत्रात कोणताही प्रकल्प राबवितांना वा सुरु करतांना पेसा कायद्याचे उल्लंघन होणार नाही याविषयी शासनाच्या विविध विभागांना कळविले जाईल.

विशेषत फुलवडे परिसरात नियोजित पंप स्टोरेज प्रकल्पाच्या अनुषंगाने पेसा कायद्याचे पालन व्हावे अशी अपेक्षा शिष्टमंडळाने यावेळी व्यक्त केली.

यावेळी किसान सभेचे राज्य सहसचिव डॉ.अमोल वाघमारे,जिल्हा सचिव अशोक पेकारी,जिल्हा उपाध्यक्ष राजू घोडे, याचबरोबर काँग्रेस पक्षाचे नेते अशोक अप्पा काळे पाटील,डी.वाय.एफ. आय.संघटनेचे अभिनाश गवारी,आदिवासी अधिकार राष्ट्रीय मंचाचे अर्जुन काळे, यांनी आपल्या मनोगतात राज्य व केंद्र शासनाच्या, शेतकरी व कामगार विरोधी धोरणाचा तीव्र शब्दात निषेध व्यक्त केला.या आंदोलनाचे आयोजन किसान सभा तालुका समितीचे अध्यक्ष कृष्णा वडेकर,तालुका सचिव कमल बांबळे,अशोक जोशी,दत्ता गिरंगे,सुभाष पारधी, सागर काठे,अनिल किर्वे,रुपाली करवंदे यांनी केले होते.

श्रावणाच्या तोंडावर मल्लिकार्जुन मंदिरात चोरी झाल्याने शिवभक्तांमध्ये संताप

चोरट्यांचा तातडीने शोध घेण्याची मागणी

कवठे येमाई/ प्रतिनिधी

शिरूर तालुक्यातील मलठण येथील प्रसिद्ध मल्लिकार्जुन मंदिरात चोरट्यांनी दिवसाढवळ्या दानपेटी फोडून त्यातील रोकड लंपास केल्याची धक्कादायक घटना मंगळवारी (दि. ११) उघडकीस आली. श्रावण महिना सुरू होण्यापूर्वीच मंदिरात चोरी झाल्याने परिसरातील शिवभक्तांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, श्रावण महिना लवकरच सुरू होणार असल्याने मंदिराची साफसफाई करण्यासाठी अभिजित गुरव हे मंदिरात गेले होते. त्यावेळी त्यांना मंदिरातील दानपेटी फोडलेल्या अवस्थेत आढळून आली.

त्यांनी तत्काळ याबाबत अशोक दंडवते व निलेश वेताळ यांना माहिती दिली. त्यांनी हि माहिती ग्रामस्थांना दिली.

मंदिरातील दानपेटी फोडून चोरट्यांनी त्यातील रक्कम लंपास केल्याने भाविकांमध्ये नाराजीचे



वातावरण निर्माण झाले आहे. धार्मिक स्थळांवर अशा प्रकारे चोरीच्या घटना घडत असल्याने मंदिरांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.या घटनेचा सखोल तपास करून चोरट्यांचा तातडीने शोध घ्यावा आणि त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी परिसरातील शिवभक्त व ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. श्रावण महिन्याच्या पार्श्वभूमीवर मंदिर परिसरात सुरक्षा व्यवस्था वाढविण्याची मागणीही जोर धरू लागली आहे.

पत्रकार समाजभूषण कैलास गायकवाड यांना 'महाराष्ट्र भूषण पुरस्कार - २०२६' जाहीर

तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेच्या वतीने सन्मान

विशेष पत्रकार/ कैलास गायकवाड
आंबेगाव/ पुणे

पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील आदर्श समाजसेवक व पत्रकार समाज भूषण मा. कैलास बबनराव गायकवाड यांना तथागत बहुउद्देशीय संस्था मेहकर द्वारा आयोजित व तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेच्या संयुक्त विद्यमाने 'महाराष्ट्र भूषण पुरस्कार - २०२६' जाहीर करण्यात आला आहे.समाजसेवा आणि पत्रकारितेच्या क्षेत्रात गेल्या अनेक वर्षांपासून गायकवाड यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार जाहीर झाला आहे. आंबेगाव तालुक्यातील सामाजिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक उपक्रमांमध्ये त्यांचा मोलाचा वाटा आहे.

हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेचे समस्त पदाधिकारी,



महिला आघाडी व कार्यकर्त्यांनी त्यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे.

संघटनेच्या वतीने लवकरच सन्मान सोहळा आयोजित करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. पत्रकार समाज भूषण कैलासराव गायकवाड यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल भटक्या मुक्त जाती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ.शिवलाल जाधव तसेच जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष विवेक दादा वळसे पाटील यांनी अभिनंदन केले आहे.

अन्यथा, १५ ऑगष्टला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सामुदायिक आत्मदहन करणार !

सातारा /अनिल वीर : विविध मागण्यांसाठी अमरण उपोषणास सुरू करण्यात आले असून जर न्याय न मिळाल्यास वेळ प्रसंगी १५ ऑगस्ट या दिवशी सामुदायिक आत्मदहन करणार असल्याचे स्पष्ट संकेत रिपब्लिकन सेनेचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष रमेश उबाळे यांनी दिले.



यावेळी जिल्हाध्यक्ष अक्षय कांबळे, महासचिव नितीन रोकडे, मातंग आघाडीचे जिल्हाध्यक्ष साईनाथ खंडागळे, अल्पसंख्याक विभागीय जिल्हाध्यक्ष जमीर शेख, तालुकाध्यक्ष तोषिफ शेख आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात विविध मागण्या केलेल्या आहेत.त्या पुढीलप्रमाणे आहेत.

सातारा नगरपालिका सर्व अनधिकृत बांधकाम असलेल्या हॉस्पिटलची फेर तपासणी करणे. इमारतीस पार्किंग नाही. तसेच पार्किंगमध्ये कॅन्टीन, मेडिकलचा वापर करून मंजूर बांधकाम नकाशामध्ये फेरबदल केलेल्या हॉस्पिटलवरती कोणतीही कारवाई झालेली नसून सदरील हॉस्पिटलला त्वरित टाळे ठोकले पाहिजेत. दिनांक १७/४/२०२६ रोजी १०८ वरती फोन केल्यानंतर रुग्णवाहिका निष्काळजीपणामुळे एकाचा मृत्यू झाला आहे.त्याची वारंवार तक्रार करून सुद्धा त्याच्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई नाही.तेव्हा त्याच्यावरती तात्काळ कारवाई करावी.आनेवाडी टोलनाका शेजारील हॉटेल साई राजा चंदू चहावाले यांच्यावरती कडक कारवाई करावी.कर्मवीर कॉलनी राधिका रोड वरील भारत जनरल स्टोअर या नावाने सुरू असलेले दुकान चेक करून दोशी आडळल्यास सील करावे.श्रीराम फायनान्सचे संग्राम पाटील व सुनील पाटील हे ऑडिटच्या नावाखाली महिलांना शारीरिक व मानसिक त्रास देणाऱ्या नराधमांना ताकाळ अटक करन त्यांच्यावरती गुन्हा दाखल कराबा.सातारा शहरातील अनाधिकृत टॉवर्स व इमारतीबरील फलेक्स, होर्डिंग व रस्त्यावरील होर्डिंग यांच्यावरती ताकाळ कारवाई करून काढून टाकावेत. सातारा तालुका पोलीस स्टेशन हद्दीतील यवतेश्वरपासून सुरू होणाऱ्या हॉटेलवरती व सातारा हायवेलगत असणाऱ्या हॉटेलवरती विनापरवाना दारू पिऊन देत असल्याबाबत त्यांच्यावरती कायदेशीर कारवाई करून त्वरित सील करण्यात यावे. एमएसईबीचे टेंडरधारक सोमनाथ गोडसे व कर्मचारी आकाश साळुंखे यांनी गोरगरिबाची फसवणूक केल्याबाबत ताकाळ कारवाई करून सदरचे टेंडरधारक याला काळ्या यादीत घालावे.अशा मागण्या असून जर मान्य न झाल्यास १५ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारीलयाबाहेर सामूहिक आत्मदहन करणार आहोत. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील. असेही निवेदनात म्हटले आहे.याबाबतच्या निवेदनाच्या प्रति माहितीसाठी नगरपरिषद मुख्याधिकारी व नगराध्यक्ष,निरीक्षक सातारा तालुका पोलीस स्टेशन व जिल्हा शल्यचिकित्सक,अन्नव भेसळ कार्यालय,अधीक्षक सातारा राज्य उत्पादन शुल्क व कार्यकारी अभियंता एमएसईबी,सातारा यांना देण्यात आलेल्या आहेत.

पंचरत्न इंग्लिश मिडियम स्कूल, पिरकोन चे शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश.

तालुका प्रतिनिधी/ विठ्ठल ममतावादे

उरण : रयत शिक्षण संस्थेचे पंचरत्न इंग्लिश मिडियम स्कूल, पिरकोन च्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून शाळेच्या शैक्षणिक यशात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे.

इयत्ता ४ थी मधील कु. आवनी विकास गावंड हिने १९४ गुण, इयत्ता ५ वी मधील कु. आर्य निलेश म्हात्रे याने १७४ गुण, तर इयत्ता ७ वी मधील कु. विधेश सदाशिव जोशी याने २३४ गुण मिळवून शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन करून रायगड जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीत येण्याचा बहुमान मिळवला आहे . त्यांच्या या यशामुळे शाळेचे नाव उज्ज्वल झाले असून परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांची मेहनत, नियमित अभ्यास, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे प्रोत्साहन यांचा मोलाचा वाटा आहे.विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या यशाबद्दल रयत शिक्षण संस्था रायगड विभाग समन्वय समितीचे सदस्य आणि रा. जि. प. सदस्य जीवन गावंड,स्थानिक सल्लागार समितीचे चेअरमन रमाकांत गावंड,व्हाईस चेअरमन अनंतदादा गावंड,स्कूल कमिटीचे सदस्य अनंत ना. गावंड,रमाकांत जोशी, विलास गावंड,मुकुंद गावंड,राजेंद्र गावंड, सुरेंद्र गावंड,लक्ष्मण गावंड, हिराचंद पाटील,चंद्रकांत पाटील, प्रा. प्रमोद म्हात्रे,मनोहर गावंड, मंगेश गावंड,नरेंद्र गावंड,बिलास गावंड, शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीम. निकीता गायकवाड, शिक्षकवृंद आणि पालकांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.शाळेच्या वतीने विद्यार्थ्यांचा गौरव करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या.

सुमती कदम हिची भारतीय वनसेवेत उत्तुंग झेप !



सातारा /अनिल वीर

जिल्हा बाल विकास समिती संचलित, गोकूळ प्राथमिक शाळा ही पुन्हा एखादा अभिमानाने उजळून निघाली आहे. शाळेची माजी विद्यार्थिनी सुमती यशवंत कदम हिने प्रतिष्ठित भारतीय वनसेवा (ष्एए) परीक्षेत देशात २६ वी आणि संपूर्ण महाराष्ट्र राज्यात दुसरी रँक मिळवून गगनभरारी घेतली आहे.

तिच्या या यशाने जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.?सुमतीचे प्राथमिक शिक्षण गोकूळ प्राथमिक शाळा, कृष्णानगर येथे झाले. सुरुवातीपासूनच अभ्यासात अत्यंत हुशार असलेल्या सुमतीने सातवी शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये २००६ साली जिल्ह्यात सहावा क्रमांक पटकावला होता. दहावीच्या परीक्षेत ९६ टक्के आणि बारावीत ८८ टक्के गुण मिळवून आपले गुणवंतपण सिद्ध केले होते. त्यानंतर तिने बाबासाहेब आंबेडकर टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटीमधून ॅऊम्प (इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग) ही पदवी पूर्ण केली. सुमतीचे वडील यशवंत कदम हे सेवानिवृत्त

राज्यात दुसरी तर देशात २६ वी रँक !!

अकाउंटंट आहेत. आई गृहिणी आहे. अत्यंत सामान्य कुटुंबातून आलेल्या सुमतीने कधीही परिस्थितीचे भांडवल केले नाही. कष्टाची आणि जिद्दीची जोड देत तिने हे यश संपादन केले आहे. विशेष म्हणजे भारतीय वनसेवेत निवड होण्यापूर्वी तिने बृहन्मुंबई महानगरपालिकेत १० वर्षे सेवा दिली आहे. नोकरी सांभाळून प्रचंड मेहनत आणि अभ्यासातील सातत्याच्या जोरावर तिने हे मोठे यश मिळवले आहे.?एका इंजिनिअरिंग पदवीधर मुलीने वनसेवेत धेतलेली ही झेप अत्यंत कौतुकास्पद आहे. पर्यावरणाचे रक्षण आणि देशाच्या वनसंपदेचे संवर्धन करण्याच्या उद्देशाने तिने हे क्षेत्र निवडले आहे.

?सुमतीच्या या देदीप्यमान यशाबद्दल गोकूळ प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका, सर्व शिक्षक, व्यवस्थापन समिती आणि कृष्णानगर येथील ग्रामस्थांनी तिचे मनापासून अभिनंदन केले आहे.

'गोकूळ शाळेच्या मातीत शिकलेल्या विद्यार्थिनीने आकाशात अशी उत्तुंग झेप घेतल्याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. तिचे हे यश शाळेतील इतर सर्व विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल.' अशा भावना मान्यवरांनी व्यक्त केल्या.

याबद्दल जिल्हा बाल विकास समितीच्या अध्यक्षा शकुंतला कासट,उपाध्यक्ष सागर प्रभाळे, सचिव विनोद कुलकर्णी, सर्व संचालक मंडळ, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सौ. निलम पाटील,मुख्याध्यापिका सौ. मिनल खटावकर, बालवाडीच्या प्रमुख सौ. संध्या महामूलकर यांच्यासह पदवीधर शिक्षक सौ. वर्षलता धनावडे, रामदास चौगुले,सुवर्णा काळे, संजय सावंत,शशिकांत चव्हाण, सौ. चित्रा शिंदे, कु. जयश्री घेवदे, सुनिता निकम व फुलाबाई अडागळे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

मराठा सेवा संघ संभाजी ब्रिगेडच्या कंधार तालुका कार्याध्यक्ष व वाहतूक आघाडीच्या तालुकाध्यक्षची निवड



कंधार/संतोष कांबळे

नांदेड जिल्ह्यात सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटविणाऱ्या मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेडच्या तालुका कार्याध्यक्ष पदी विठ्ठल पाटील भुत्ते तर उमाकांत पाटील लाडेकर यांचे वाहतूक आघाडीच्या तालुकाध्यक्षपदी कंधार तालुका अध्यक्ष संदीप पाटील तोंडचिरे यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देऊन निवड करण्यात आली.

जिल्ह्यात मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड या सामाजिक संघटनेला सक्रिय संघटन म्हणून ओळखले जाते. त्यांच्या माफ्त विविध लोकउपयोगी उपक्रम आणि चांगले सामाजिक कार्य चालू आहे. संभाजी ब्रिगेडचे तालुका अध्यक्ष संदीप तोंडचिरे यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्याचे औचित्य साधून आयोजित कार्यक्रमात कंधार तालुका कार्याध्यक्ष पदी विठ्ठल पाटील भुत्ते तर उमाकांत पाटील लाडेकर यांचे वाहतूक आघाडीच्या तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली.

मराठा सेवा संघ संभाजी ब्रिगेडच्या वतीने मे महिन्यात घेण्यात आलेल्या भव्य रोजगार मेळाव्यात सुमारे एक हजारापेक्षाही जास्त तरुणांना रोजगार मिळवन दिला आहे. सोबतच शेतकऱ्यांसाठी विविध कल्याणाकारी योजना, शेतकरी मेळावे आयोजित करून त्याच्यासाठी विविध उपक्रम हाती घेतले आहेत. त्यामुळे जिल्ह्यात मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेडच्या कार्याची चर्चा सर्वत्र होत आहे.

याप्रसंगी युवा उद्योजक सतीश पाटील जाधव, युवा उद्योजक अनिल पाटील लाडेकर, त्रिभुवन मोरे,संभाजी पाटील लाडेकर, देवानंद पाटील मोरे,दिगंबर पाटील तोंडचिरे व संभाजी ब्रिगेडचे पदाधिकारी उपस्थित होते

आदिवासी व गरजू विद्यार्थ्यांना गणवेश वाटप



तालुका प्रतिनिधी/ विठ्ठल ममतावादे

उरण : प्राध्यापक जयदास पाटील शिक्षण प्रसारक संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी महाराज विद्यालय, वशेणी येथील आदिवासी, गरीब व गरजू विद्यार्थ्यांना 'स्व. संगीता मच्छिंद्रनाथ ठाकूर फाउंडेशन'च्या वतीने गणवेश वाटपाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. सामाजिक बांधिलकी जपत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीला हातभार लावणाऱ्या या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.फाउंडेशनचे अध्यक्ष, माजी जिल्हा परिषद सदस्य वैजनाथ मच्छिंद्र ठाकूर तसेच त्यांच्या अर्धांगिनी, माजी जिल्हा परिषद सदस्य व राष्ट्रवादी काँग्रेस उरण विधानसभा अध्यक्ष कुंदा वैजनाथ ठाकूर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रवादी काँग्रेस रायगड सरचिटणीस प्रवीण रामशेठ ठाकूर होते. त्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यानंतर ईशस्तवन व स्वागतगीताने वातावरण मंगलमय झाले.

यावेळी मच्छिंद्र ठाकूर (ओबीसी सेल अध्यक्ष), रामदेव मवळी, नित्यानंद घरत, रतन म्हात्रे, नामदेव मवळी, हिराचंद पाटील, कोणते पाटील तसेच जयदास पाटील शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अनिल पाटील, सचिव राकेश पाटील, सदस्य प्रदीप पाटील, माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष शांताराम पवार, कार्याध्यक्ष सुशांत म्हात्रे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या शुभप्रसंगी शाळेचे माजी विद्यार्थी बंधन म्हात्रे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना ओळखपत्रांचे वाटप करण्यात आले. तसेच सामाजिक कार्यकर्ते निवेश ठाकूर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गणवेश देण्यात आले.

कार्यक्रमात मार्गदर्शन करताना वैजनाथ ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना प्रशासकीय अधिकारी तुकाराम मुंढे यांच्या कार्याची माहिती देत त्यांच्या जीवनावर आधारित पुस्तक दाखवून त्यांच्या आदर्श व्यक्तिमत्त्वाची ओळख करून दिली. विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांशी ग्रामाणिकपणे वागावे, शिक्षणाकडे गांभीर्याने पाहावे आणि आपल्या आई-वडिलांसह शाळेचे नाव उज्ज्वल करण्यासाठी मेहनत घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

'गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व गणवेश उपलब्ध करून देणे ही केवळ मदत नसून समाजाप्रती असलेली जबाबदारी आहे,' असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आकाश पाटील सर यांनी केले, तर शाळेचे मुख्याध्यापक प्रवीण पाटील सर यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या शेवटी वैजनाथ ठाकूर यांच्या वतीने विद्यार्थ्यांना नाश्त्याचे वाटप करण्यात आले.आदिवासी, गरीब व गरजू विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद आणि उपस्थित ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे हा सामाजिक उपक्रम मोठ्या उत्साहात व उत्तम प्रतिसादात संपन्न झाला.

सामाजिक बांधिलकीचा आदर्श

पहाटेच्या अंधारात रेती चोरीचा 'खेळ' उधळला!

तळेगाव पोलिसांची टेकोंडा नदीपात्रात धडक कारवाई; दोन ट्रॅक्टरसह १०.१६ लाखांचा मुद्देमाल जप्त



तळेगाव (शा.पं.) : चोरीची रेती अवैधरित्या वाहतूक करणाऱ्या दोन ट्रॅक्टरवर तळेगाव पोलिसांनी पहाटेच्या सुमारास धडक कारवाई केली. या कारवाईत दोन ट्रॅक्टर व त्यातील दोन ब्रास रेती असा एकूण १० लाख १६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तळेगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीत चोरीची रेती वाहतूक रोखण्यासाठी विशेष मोहीम सुरू आहे. दि. ११ ऑगस्ट २०२६ रोजी पहाटे सुमारे ३.३० वाजता मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांच्या विशेष पथकाने मौजा टेकोंडा येथील नदीपात्राजवळ कारवाई केली.

या कारवाईदरम्यान चोरीची रेती अवैधरित्या वाहतूक करणारे दोन ट्रॅक्टर पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यामध्ये MH-32-AX-3297 व MH-27-BZ-8512 या क्रमांकाच्या ट्रॅक्टरचा समावेश आहे. दोन्ही ट्रॅक्टरची अंदाजे किंमत १० लाख रुपये, तर त्यामध्ये असलेल्या दोन ब्रास रेतीची किंमत १६ हजार रुपये, असा एकूण १० लाख १६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी प्रतिक साहेबराव कडू (वय २३, रा. भिष्णूर, ता. आष्टी, जि. वर्धा), निलेश धोंडबाजी कुंभरे (वय ३२, रा. काकडदरा, तळेगाव (शा.पं.), ता. आष्टी, जि. वर्धा) आणि मयंक खेडे (वय २३, रा. आष्टी रोड, तळेगाव (शा.पं.), ता. आष्टी, जि. वर्धा) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लावण्यात आलेली कलमे

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता (नि) कलम ३०३(२), ४९, तसेच सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंधक कायदा कलम ३, उपकलम ४, खान व खनिज अधिनियम कलम २१, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम कलम ४८(७), (८), पर्यावरण संरक्षण अधिनियम कलम ३, १५ आणि मोटार वाहन कायद्यान्वये कलम ३(१), १८१, १३०/१७७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रेती चोरी व अवैध वाहतुकीविरोधातील ही कारवाई पोलीस अधीक्षक, वर्धा, अपर पोलीस अधीक्षक तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक मंगेश भोयर, ठाणेदार तळेगाव (शा.पं.), सहायक फौजदार प्रफुल्ल माहुरे, पोलीस अंमलदार पोशी सचिन डाले, अंकुश कुरवाडे, आबासाहेब साळवे यांनी सहभाग घेतला.

तिघांविरुद्ध BNS कलम ३०३(२), ४९ सह विविध कायद्यांनुसार गुन्हा दाखल

सेलगाव उमाटे शिवारात पट्टेदार वाघाचे दर्शन; शेतकऱ्याच्या बैलावर हल्ला, ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण



कारंजा: कारंजा तालुक्यातील सेलगाव उमाटे येथील शेतशिवारात आज सायंकाळी ५:३० वाजेच्या सुमारास पट्टेदार वाघाचे थेट दर्शन झाल्याची घटना घडली आहे. शेतामध्ये वाघ मोकळ्यापणाने वावरताना दिसल्याने परिसरातील शेतकरी आणि ग्रामस्थांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आज सायंकाळी साडेपाच वाजताच्या सुमारास सेलगाव उमाटे परिसरातील शेतात काम करत असताना ग्रामस्थांना पट्टेदार वाघ दिसून आला. उपस्थित नागरिकांनी या घटनेची चित्रफित आपल्या प्रमाणपत्रनीवर चित्रीत केली असून, त्यात वाघ शेताच्या कडेने व झुडपांच्या आधारे वावरताना दिसत आहे.

दरम्यान, या शिवारात वाघाच्या हल्ल्यात एका शेतकऱ्याचा बैल जखमी झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे शेतकरी वर्ग भयभीत झाला आहे.

सध्या शेतीची कामे अंतिम टप्प्यात असून शेतकरी व शेतमजूर मोठ्या संख्येने शिवारात असतात. मात्र, सायंकाळच्या वेळी वाघाची भ्रमंती दिसून आल्याने आणि पाळीव प्राण्यावर हल्ला झाल्याने बळीराजा चिंतेत सापडला आहे.

?घटनेची माहिती तात्काळ वन विभागाला देण्यात आली आहे. जखमी बैलाचा त्वरित पंचनामा करून बाधित शेतकऱ्याला योग्य आर्थिक मदत देण्यात यावी, तसेच परिसरात गस्त वाढवून वाघाचा योग्य बंदोबस्त करावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. वनविभागाने देखील परिसरातील नागरिकांना शेतात जाताना खबरदारी बाळगण्याचे आणि वन्यजीवांची हालचाल आढळल्यास तात्काळ प्रशासनाला सुचित करण्याचे आवाहन केले आहे.

दारू दुकानदारांना लगाम !; हाऊसिंग सोसायट्या होणार 'मालामाल'



परभणी / दत्तात्रय कराळे

महाराष्ट्र शासनाने गृह विभागाच्या माध्यमातून अत्यंत महत्त्वपूर्ण असा निर्णय घेतला असून राज्यातील लाखो रहिवाशांना त्यामुळे मोठा दिलासा मिळणार आहे. या नव्या निर्णयानुसार, आता कोणत्याही रहिवाशी किंवा व्यावसायिक-सह-रहिवाशी इमारतीमध्ये दारूची नवीन दुकानं सुरू करण्यासाठी किंवा जुनी दुकान स्थलांतरित करण्यासाठी संबंधित नोंदणीकृत हाऊसिंग सोसायटीची 'ना हरकत प्रमाणपत्र' अनिवार्य करण्यात आली आहेत. गृह विभागाने यासंदर्भातील अधिसूचना तात्काळ लागू केली असून, त्यामुळे आता सोसायट्यांना आपल्या परिसरात मद्यविक्रीची दुकाने रोखण्याचा कायदेशीर अधिकार मिळाला आहे. तद्वतच या नव्या नियमांमुळे हौसिंग सोसायट्या आता मात्र 'मालामाल' होणार आहेत.

मुंबई, ठाणे आणि पुणे यांसारख्या महानगरांमध्ये रहिवाशी इमारतीच्या तळमजल्यावर मोठ्या प्रमाणात दारूची दुकाने उघडल्यामुळे रहिवाशांना विविध समस्यांचा सामना करावा लागत होता. दुकानांसमोरील गर्दी, अवैध पार्किंग, मद्यपींचा त्रास आणि रात्री उशिरापर्यंत सुरू राहणाऱ्या गोंगाटामुळे महिला, लहान मुले आणि ज्येष्ठांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला होता.

याचबरोबर, मद्यविक्री परवानाधारक कायदेशीर त्रुटींचा फायदा घेत असत. अनेकदा इमारत पूर्ण विकसित होण्यापूर्वी किंवा सोसायटीची औपचारिक स्थापना होण्यापूर्वीच दुकानांचे परवाने मिळवले जात असत. त्यामुळे रहिवाशांना कायदेशीर लढा देणे कठीण जात होते. आता शासनाने 'बॉम्बे फॉरेन लिकर रूल्स, १९५३' आणि 'महाराष्ट्र कंट्री लिकर रूल्स, १९७३' मध्ये सुधारणा करत २०२६ चे सुधारित नियम लागू केले आहेत. यानुसार, विदेशी (एफएल-२) आणि देशी (सीएल-३) दारूच्या दुकानांसाठी सोसायटीची मंजुरी बंधनकारक करण्यात आली आहे. या संदर्भात टाइम्स ऑफ इंडियाने नुकतेच एक वृत्त प्रकाशित केले आहे.

रिअल इस्टेट क्षेत्रात अनेकदा बिल्डर इमारतीचे केवळ खालचे मजले किंवा व्यावसायिक गाळे पूर्ण करून 'पार्टीयल ओसी' प्राप्त करतात, तर वरच्या मजल्यांचे बांधकाम सुरू असते. या आंशिक तांबा प्रमाणपत्राचा गैरफायदा घेऊन दारू व्यावसायिक रहिवासी येण्यापूर्वीच आपले बस्तान मांडत असत. महाराष्ट्र शासनाने या नव्या नियमात स्पष्ट केले आहे की, इमारतीला केवळ 'पार्टीशियल ओसी' मिळालेली असली, तरीही त्या ठिकाणी दारूचे दुकान सुरू करण्यासाठी सोसायटीची परवानगी घेणे कायद्याने बंधनकारक राहील. असा जाचक नियम लागू केला आहे.

या नियमावलीमुळे व्यापाऱ्यांना काही अंशी दिलासा मिळाला असला तरी मात्र चिंताही तेवढीच कायम राहिली जाणार आहे. तर

दुसरीकडे, व्यावसायिकांच्या हिताचा विचार करून शासनाने एकाच मुद्द्यावर मोठा दिलासा दिला आहे. एकदा कायदेशीररीत्या दुकान स्थलांतरित झाल्यानंतर परवानाधारकांना दरवर्षी नूतनीकरणाच्या वेळी पुन्हा-पुन्हा नवीन एनओसी घेण्याची आवश्यकता असणार नाही. यामुळे दरवर्षी होणाऱ्या मनस्तापापासून सुटका होईल एवढे मात्र खरे आहे.

मद्यविक्री करणाऱ्या व्यापार संघटनांनी या निर्णयावर संमिश्र प्रतिक्रिया दिली आहे. एखादा व्यवसाय राज्य उत्पादन शुल्क आणि महानगरपालिका सुरक्षा कायद्यांचे पूर्णपणे पालन करत असला तरी, सामाजिक कलंकामुळे गृहनिर्माण सोसायट्या अनेकदा सरसकट परवानगी नाकारतात. बहुतेक जुन्या इमारती आणि शॉपडपट्ट्या एसआरए किंवा पुनर्विकासाखाली येत असल्याने, अनेक दारूची दुकाने बंद करून स्थलांतरित करावी लागतील. या नवीन नियमामुळे त्यांना नवीन ठिकाणी दुकान उघडणे खूप कठीण होईल असे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे.

गृहनिर्माण संस्थांच्या महासंघांनी या दुरुस्तीचे रहिवासी हक्कांसाठीचा एक ऐतिहासिक विजय म्हणून स्वागत केले आहे. वर्षानुवर्षे, व्यावसायिक जागांचे मालक त्यांच्या अगदी वर राहणाऱ्या रहिवाशांशी सल्लामसलत न करता तळमजल्यावरील सदनिका दारूच्या दुकानांना विकत किंवा भाड्याने देत असत. मद्यधुंद गर्दीचा आणि रात्री उशिरा होणाऱ्या गोंधळाचा त्रास कुटुंबांना सहन करावा लागत होता. एकूणच काय तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सरकार सत्तेवर बसले तेव्हापासूनच अशा प्रकारचा निर्णय आणला जावा, यासाठी भाजपाचे काही अग्रणी पदाधिकारी प्रयत्नशील होते.

वर्सई-विरार उपप्रदेशात प्रामुख्याने महापालिका कार्यक्षेत्रात लोकनेते हितेंद्र ठाकूर यांच्या पक्षाचे किंवा त्यांना मानणारे बहुसंख्य बिल्डर आहेत. त्यांच्या मालकीच्या किंवा त्यांनी निर्माण केलेल्या अनेक इमारती असून तेथे त्यांनाच मानणाऱ्या वर्गाकडून अशा प्रकारचे दार विक्रीचे किंवा बीयर शॉपीचे व्यवसाय मोठ्या प्रमाणात व्यवसाय थाटले गेले आहेत. तर, तेथील गृह प्रकल्पांमध्ये अर्थात सदरील हौसिंग सोसायटीतील बहुसंख्य रहिवासी मात्र हे यूपी, बिहार, गुजरात, राजस्थान सारख्या राज्यातील असून तो बहुधा भाजपाला मानणारे आहेत. दरम्यान, हा सर्व सिलसिला अनेक वर्षांपासून चालत आला असला तरी या क्षेत्रात झालेल्या राजकीय समीकरणाचा फायदा घेण्यासाठी भाजपाच्या काही पदाधिकाऱ्यांनी ही शक्कल लढविल्याचे बोलले जात आहे. अशा प्रकारचा निर्णय घेऊन दार विक्री व्यावसायिकांना गर्तेत कसे आणता येईल याचे निमित्त करुन त्या हौसिंग सोसायटीतील पदाधिकाऱ्यांनी रहिवाशांना तक्रार अर्ज गोळा करण्याचे सुचविले होते. ही मोहीम मोठ्या प्रमाणात राबवून थेट मुलाखती देवेंद्र फडणवीस यांच्यापर्यंत ती पोहोचवण्याचे काम केले होते असेही कळतंय. तथापि लागू करण्यात आलेला हा कायदा केवळ वर्सई-विरारसाठीच नसून तो संबंध राज्यभरासाठी आहे. मुंबई, ठाणे आणि पुणे आदी सरावर मोठ्या प्रमाणात राबविला जाणार असून त्याचा फायदा तूर्त तरी वरील नमूद शहरांमधील कार्यरत हौसिंग सोसायट्यांना बऱ्यापैकी होणार असल्याचं गृहीत धरायला हरकत नाही.

रामकृष्ण वाघ महाविद्यालयामध्ये ग्रंथपाल दिन उत्साहात साजरा

ज्ञानाचे भांडार असलेल्या ग्रंथालय दिनानिमित्त विविध उपक्रम

कोरडी / दिलीप येवले: -

छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेद्वारा संचालित रामकृष्ण वाघ कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स, सरस्वती महाविद्यालय व सरस्वती गर्ल्स कॉलेज (ए-ग्रेड) यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रंथपाल दिनाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी व्यासपीठावर प्रभारी प्राचार्य प्रा.पंकज झगडे, सर्व शाखा विभाग प्रमुख प्रा. दीपक ठाकरे, रामकृष्ण वाघ कॉलेजचे ग्रंथपाल प्रा. हर्षल रोठे, सरस्वती महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा.तुषार खरवडे, सरस्वती गर्ल्स कॉलेजच्या ग्रंथपाल प्रा .ममता करडे, वाणिज्य व सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. किरण पांडे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी सरस्वती माता व एस आर रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन करून दिपप्रज्वलन करण्यात आले यावेळी. विद्यार्थ्यांना ग्रंथालयाचे महत्त्व, वाचनाची आवड आणि विविध संदर्भ ग्रंथांचा अभ्यास याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

'ग्रंथालय हे केवळ पुस्तकाचे भंडार नसून विद्यार्थ्यांच्या ज्ञान वृत्तीचे आणि व्यक्तिमत्व विकासाचे केंद्र आहे विद्यार्थ्यांनी नियमित वाचनाची सवय जोपासावी' असे वक्तव्य अध्यक्ष मनोगतातून सर्व शाखा विभाग प्रमुख प्रा.दीपक ठाकरे यांनी केले. विविध उपक्रम हे ग्रंथालय डिजिटल साधने तसेच विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या संदर्भ साहित्याची माहिती रामकृष्ण वाघ महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा.हर्षल रोठे यांनी दिली. विद्यार्थ्यांसाठी पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. उत्कृष्ट वाचक म्हणून काही विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी म्हणून विविध उपक्रम राबविण्यात आले. कार्यक्रमाला सर्वांचे संस्थापक सचिव मा. डॉ. मारोती वाघ, संस्थेच्या संचालिका प्राचार्या डॉ. लता वाघ यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सरस्वती गर्ल्स कॉलेजच्या ग्रंथपाल प्रां. ममता करडे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा .सोनाली कावळे यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा .जयश्री गवळी यांनी केले.

कार्यक्रमाला सर्व प्राध्यापक वृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



संत सावता महाराज व संत नामदेव महाराजांच्या समाधी सोहळ्यात शेख चाँद साहेबांचा माणुसकीचा संदेश; संपुर्ण दिवस अन्नदान

बीड वडवणी / प्रतिनिधि

निवृत्ती संत शिरोमणी श्री सावता महाराज व संत नामदेव महाराज यांच्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त निवृत्ती येथे आयोजित सार्वजनिक सप्ताहात आर.सी. बिट सप्तायर्सचे शेख चाँद साहेब यांच्या वतीने संपूर्ण दिवस भाविकांसाठी अन्नदान करण्यात आले. या अन्नदान सेवेतून त्यांनी सर्वधर्मसमभाव व सामाजिक एकतेचा संदेश दिला.

संत सावता महाराज व संत नामदेव महाराज यांच्या संजीवन समाधी सोहळ्यासाठी परिसरातून मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. या भाविकांसाठी शेख चाँद साहेब यांनी दिवसभर अन्नदानाची व्यवस्था करून सामाजिक बांधिलकी जपली. त्यांच्या या उपक्रमाचे सार्वजनिक सप्ताह कमिटीसह उपस्थित भाविकांनी कौतुक केले.

मुस्लिम समाजातील असूनही संत सावता महाराज व संत नामदेव महाराजांच्या धार्मिक सोहळ्यात अन्नदानाच्या माध्यमातून सेवा करण्याचा उपक्रम राबवून शेख चाँद साहेब यांनी सर्वधर्मसमभाव आणि माणुसकीचा आदर्श समाजासमोर ठेवला आहे. धर्म, जात-पंथाच्या पलीकडे जाऊन समाजासाठी योगदान देणे हीच खरी समाजसेवा असल्याचे त्यांच्या या उपक्रमातून दिसून आले.

यावेळी सार्वजनिक सप्ताह कमिटीच्या वतीने शेख चाँद साहेब यांचे आभार व्यक्त करण्यात आले. 'माणुसकीला धर्माची सीमा नसते. समाजात प्रेम, बंधुभाव आणि एकोपा वाढविण्यासाठी अशा सेवाभावी उपक्रमांची गरज आहे,' अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

शेख चाँद साहेब यांच्या या अन्नदान सेवेमुळे सामाजिक सलोखा आणि सर्वधर्मसमभावाचा संदेश परिसरात पोहोचला असून त्यांच्या सेवाभावी कार्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.



शासकीय माध्यमिक आश्रमशाळा चिखलगाव येथे बेलवृक्ष वाटप



महंमद मुलाणी / भीमाशंकर

चिखलगाव ता. खेड येथील शासकीय माध्यमिक आश्रम शाळेत साजरा करण्यात आला. शिवभक्त कमलेश शारदाप्रसाद मिश्रा यांच्या सौजन्याने बेलवृक्ष वाटप, वृक्षारोपण कार्यक्रम व शैक्षणिक साहित्य वाटप हा कार्यक्रम संपन्न झाला.

पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्षांचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देणे, शालेय परिसर हरित करणे तसेच विद्यार्थ्यांना शैक्षणिकदृष्ट्या प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, चिखलगाव येथे बेलवृक्ष वाटप, शैक्षणिक साहित्य वाटप व वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भिमाशंकर रोपवे कृती व रस्ता समितीचे अध्यक्ष श्री. किसनराव गोपाळ यांनी भूषविले. कार्यक्रमास शिवभक्त श्री. कमलेश शारदाप्रसाद मिश्रा, डॉ. किशोर घुमटकर आणि श्री. शरदराव गोपाळ यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

परिसरात विविध उपक्रम राबविण्यावर आधिक भर

मान्यवरांच्या हस्ते शाळेच्या परिसरात बेलवृक्षांचे विधिवत वृक्षारोपण करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना बेलवृक्षांचे व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साधने उपलब्ध करून देणे, त्यांच्या शैक्षणिक प्रगतीला प्रोत्साहन देणे आणि पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करणे, या दुहेरी उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

वृक्षारोपण हा केवळ एक दिवसाचा उपक्रम न राहता लावलेल्या प्रत्येक रोपाचे संगोपन व संवर्धन करणेही हीच खरी पर्यावरणसेवा आहे, यावर यावेळी विशेष भर देण्यात आला. विद्यार्थ्यांनी आपल्या वाट्याला आलेल्या वृक्षांची जबाबदारी स्वीकारून त्यांचे नियमित संगोपन करण्याचा संकल्प केला.

वृक्ष आपल्याला प्राणवायू, सावली, फळे, औषधी उपयोग तसेच जैवविविधतेचे संरक्षण देतात. वाढते प्रदूषण आणि बदलते हवामान लक्षात घेता पर्यावरण संवर्धनाची गरज अधिक तीव्र झाली आहे. त्यामुळे विद्यार्थीदशेपासूनच निसर्गाविषयी प्रेम, वृक्षसंवर्धनाची सवय आणि सामाजिक जबाबदारीची भावना निर्माण होणे आवश्यक आहे. या दृष्टिकोनातून शाळेत आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक श्री. योगेश वाघुले यांनी केले. त्यांनी शाळेच्या विविध पर्यावरणपूरक व शैक्षणिक उपक्रमांची माहिती देत विद्यार्थ्यांनी केवळ वृक्षारोपण न करता 'वृक्ष लावा, वृक्ष जगवा' हा विचार कृतीत आणावा, असे आवाहन केले. तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी शैक्षणिक साहित्याचे वाटप हा उपक्रम निश्चितच उपयुक्त ठरेल, असे त्यांनी नमूद केले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत निसर्ग, पर्यावरण, शिक्षण आणि वृक्षसंवर्धनाचे महत्त्व स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवत वृक्षांचे संगोपन करण्याचा संकल्प केला. बेलवृक्ष व शैक्षणिक साहित्याचे वाटप झाल्याने विद्यार्थ्यांमध्ये विशेष आनंदाचे वातावरण होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्कृतिक विभाग प्रमुख श्री. आनंद मांजरे यांनी प्रभावीपणे केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री. गोरक्षनाथ पिंगळे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

शैक्षणिक साहित्य वाटप व वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न

लेखी आश्वासनानंतर 'सत्य शोधा' आंदोलन स्थगित...



कराड/ प्रतिनीधी

व्यक्तीगत फायद्यासाठी शासकीय यंत्रणेस वेठीस धरणारांचे आंदोलनाचे 'गौडबंगाल 'काय? अशा आंदोलनामागील सत्य शोधा' हि मागणी घेऊन दलित महासंघाचे राज्य कार्याध्यक्ष प्रकाश वायदंडे यांनी दि.९ ऑगस्ट क्रांतीदिनापासून प्रातिनिधिक बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले होते.

दि.१० रोजी पोलीस उपअधीक्षक राजश्री पाटील यांचेसोबत प्रकाश वायदंडे ,राम दाभाडे ,रमेश सातपुते यांचे शिष्टमंडळाने आंदोलनासंदर्भातील भुमिकेवर चर्चा केली.

अवैध धंद्यांविरोधात आंदोलन करीत जे आर्थिक तडजोड करत आहेत असे निदर्शनास आणून दिल्यावर त्यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे लेखी पत्र वरिष्ठ पोलीस निरीक्षक दत्तात्रय दराडे यांनी सोमवारी रात्री उशिरा आंदोलन स्थळी दिल्याने आंदोलन स्थगित करण्यात आले.

सत्य शोधा आंदोलन यशस्वी करण्यासाठी सुरज घोलप, अरुण पाटसुपे ,रावसाहेब क्षीरसागर, मंगेश गायकवाड, दत्तात्रय भिसे (फौजी), संजय तडाखे आदींनी परिश्रम घेतले.

कारंजा (घाडगे) येथे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची १०६ वी जयंती मोठ्या उत्साहात



कारंजा (घाडगे): स्थानिक खर्डीपुरा वॉर्ड क्र. १ येथील साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे समाज भवनात अण्णाभाऊ साठे यांची १०६ वी जयंती अत्यंत उत्साहात आणि भव्य वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी १०:०० वाजता पंचायत समिती चौक येथून निघालेल्या भव्य मिरवणुकीने झाली. ज्यामध्ये 'समर्थ बँड, काटोल' यांचे पथक मुख्य आकर्षण ठरले. मिरवणुकीनंतर समाज भवनात मुख्य सभेचे आयोजन करण्यात आले होते.

?या सोहळ्याचे अध्यक्षस्थान भा.ज.पा. अनुसूचित जाती मंत्री (नागपूर) मा. गुरुदासजी उद्धवराव बावणे यांनी भूषवले, तर उद्घाटक म्हणून आर्वी विधानसभेचे आमदार मा. सुमितदा वानखेडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

?याप्रसंगी विधान परिषद आमदार मा. दादाराव‌जी केचे, पोलीस निरीक्षक मा. प्रल्हादजी मदन, स्वराज्य शेतकरी संघटनेचे जयकुमार बेलखडे, शिवसेना नगरसेवक नितीन दर्यापूरकर, भाजप नगरसेवक शिरीष भांगे आणि गजानन सरोदे यांच्यासह अन्य विविध पदाधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.हा सोहळा यशस्वी करण्यासाठी आयोजक कमिटीचे अध्यक्ष कैलाश तायवाडे, उपाध्यक्ष सतीश गायकवाड, सचिव गौरव बेडे, सहसचिव अनिकेत तिरळे, कोषाध्यक्ष अतुल खंडारे सहसचिव नितीन खंडारे यांच्या सह आयोजक कमिटीच्या सर्व सदस्यांनी व समाजबांधवांनी मोलाचे परिश्रम घेतले. या जयंती महोत्सवाला परिसरातील नागरिक व बहुजन समाजबांधवांची मोठी उपस्थिती लाभली होती.



सहयोग मल्टीस्टेट शाखेत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

ता. प्र. / अमोल झाडे
समुद्रपूर: शहरात गेल्या चार वर्षांपासून दिपाली कॉम्प्लेक्स समोर शिवशाही कॉम्प्लेक्स वर्धा रोड वर असलेल्या सहयोग मल्टीस्टेट क्रेडिट को -ऑप सोसायटी शाखा समुद्रपूर व सहयोग हॉस्पिटल यांच्या मार्फत आज दि. ११ ऑगस्ट रोजी समुद्रपूर येथिल सहयोग मल्टिस्टेट क्रेडिट को ऑपरेटिव्ह ?? सोसायटी ली शाखा समुद्रपूर येथे १५० ते १७० नागरिकांचे आरोग्य तपासणी शिबिर संपन्न करण्यात आले हे शिबिर गेल्या तिन महिन्या पासून दर महिन्याला सहयोग मल्टिस्टेट क्रेडिट को ऑपरेटिव्ह ?सोसायटी ली शाखा समुद्रपूर यांच्या वतिने घेण्यात येत असून दर महिन्याला आरोग्य तपासणी होत आहे या शिबिराला नागरीकांचा उत्तम सहकार्य लाभत असल्याने हे शिबिर दर महिन्याला सुरु केले आहे. यावेळी सेल्स मॅनेजर विकेश बोरकर शाखा व्यवस्थापक अमोल झाडे, शाखा ऑपरेशन मॅनेजर देवेंद्र शंभरकर, पुजा निखार, शिमा चौधरी, साधना भोयर, सोनाली गोवारकर, स्नेहल खडसकर, प्रफुल्ल डाखोरे, गणेश गौरकर, स्वयंसेविका स्वयंसेवक, व मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

१५० ते १७० नागरिकांनी घेतला लाभ



सेलू येथे आदिवासी बांधवांच्या वतीने जागतिक मूलनिवासी दिन उत्साहात संपन्न

सेलू/ प्रशांत झाडे

निसर्ग आणि संस्कृतीचा संगम! मन जिंकले.

निसर्गाची जोपासना, प्राचीन परंपरा आणि संस्कृतीचा गौरव करत सेलू येथील बोबडे ले-आऊटमध्ये 'जागतिक मूलनिवासी दिवस' अत्यंत उत्साहात आणि पारंपरिक वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्ताने आदिवासी बांधवांनी एकत्र येत आपल्या समृद्ध वारशाचे जतन करत भव्य कार्यक्रमाचे आयोजन केले होते. आदिवासी संस्कृतीचा मूळ आधार हा निसर्ग आणि प्राकृतिक पूजेवर आधारित आहे. याच मुख्य उद्देशाला अनुसरून कार्यक्रमाची सुरुवात अत्यंत पवित्र वातावरणात झाली. यावेळी आदिवासी समाजाचे प्रतीक असलेल्या 'सप्तरंगी ध्वजाचे पूजन' तसेच प्राकृतिक शक्ती असलेल्या 'पेनकडा' यांचे विधिवत पूजन करण्यात आले. निसर्गाशी एकरूप होऊन जगणाऱ्या आदिवासी बांधवांनी आपल्या प्राचीन रीतीरिवाजांचे व पूजेचे काटेकोर पालन करत उपस्थितांचे आदिवासी बांधवांसह अनेक प्रमुख मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभली होती. यामध्ये सेलू नगरपंचायतचे बांधकाम सभापती किशोर इरपाते यांच्यासह ज्ञानेश्वरी मसराम, अर्चना उईके, सोनू मसराम, संध्या इरपाते, राजू उईके, राजू भलावी, शंकर कोवे, रवींद्र इवनाते, राजेंद्र इवनाते, आशिष कोवे आणि सुनील मसराम आदींसह मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या माध्यमातून आदिवासी समाजाची तरुण पिढी आपल्या परंपरांशी जोडून राहण्याचा संदेश देण्यात आला. पारंपरिक वाद्ये, वेशभूषा आणि सामूहिक सहभागामुळे या कार्यक्रमाने सेलू शहरात एक वेगळाच उत्साह निर्माण केला होता. आपल्या हक्कांच्या आणि संस्कृतीच्या जतनासाठी अशा प्रकारच्या आयोजनांचे महत्त्व उपस्थितांनी यावेळी अधोरेखित केले.

एकाच आठवड्यात दोन जिवलग मित्रांचे हृदयविकाराने निधन

खासदार अमर काळे यांची घोराड येथे कुटुंबीयांना सांत्वन भेट



सेलू/ प्रशांत झाडे

येथील काँग्रेसचे युवा नेते तथा घोराड ग्रामपंचायतीचे माजी सदस्य गणेश खोपडे आणि सेवाग्राम रुग्णालयातील कर्मचारी आशिष माहुरे यांच्या अकाली निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, एकाच आठवड्यात या दोन जिवलग मित्रांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाल्याने परिसरावर शोककळा पसरली आहे.

या दुःखद प्रसंगी वर्धा लोकसभा मतदारसंघाचे खासदार अमर काळे यांनी सकाळी घोराड येथे भेट देत खोपडे व माहुरे यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले. त्यांनी दोन्ही कुटुंबीयांशी आस्थेने विचारपूस करून त्यांच्या दुःखात सहभागी होत शोक व्यक्त केला.

आप्तस्वकीय गमावल्याचे दुःख मोठे आहे. या कठीण प्रसंगी कुटुंबीयांनी धैर्य राखावे, तसेच आपण सदैव त्यांच्या पाठीशी उभे राहू, अशी भावना खासदार काळे यांनी व्यक्त केली.

यावेळी काँग्रेसचे नेते शेखर शेंडे, अभ्युदय मेघे, वर्सतराव तेलरांधे, बाजार समितीचे संचालक काशिनाथ लोणकर, शिवसेनेचे तालुका अध्यक्ष अमर गुंदी, विजय घवघवे, राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष रामू पवार यांच्यासह स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थितांनीही दिवंगत गणेश खोपडे व आशिष माहुरे यांना श्रद्धांजली अर्पण करून शोकाकुल कुटुंबीयांना धीर दिला.

ॲक्युप्रेशर प्रमाणपत्र परीक्षेत ४८ विद्यार्थ्यांनी गाठली यशाची पायरी

नागपूर / दिलीप वेवले

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभाग अंतर्गत व श्री साई समर्थ एज्युकेशनल मेडिकल अँन्ड रिसर्च सोसायटीद्वारे संचालित ॲक्युप्रेशर प्रमाणपत्र अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र वितरण समारंभ रविवार, ९ ऑगस्ट २०२६ रोजी महिला महाविद्यालय, नंदनवन, नागपूर येथे उत्साहात पार पडला. या समारंभात एकूण ४८ विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. माननीय कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे आयोजन श्री साई समर्थ एज्युकेशनल, मेडिकल अँड रिसर्च सोसायटी आणि पराग कुळकर्णी ॲक्युप्रेशर ट्रीटमेंट फॉमिली यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. अध्यक्षस्थान स्त्री शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री. रवींद्र फडणवीस यांनी भूषविले. कार्यक्रमाचे विशेष अतिथी म्हणून आजीवन अध्ययन व विस्तार विभाग संचालक डॉ. समीत माहोरे उपस्थित होते.

यावेळी डॉ. समीत माहोरे यांनी समाजातील बदलत्या परिस्थितीवर मार्गदर्शन करताना कौशल्याधारित शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. ॲक्युप्रेशरसारख्या कौशल्याधारित अभ्यासक्रमांमुळे रोजगाराच्या संधी निर्माण होऊ शकतात, व्यक्तीमध्ये स्वावलंबनाची भावना निर्माण होऊ शकते तसेच समाजाच्या आरोग्यविषयक गरजा पूर्ण करण्यासाठी त्याचा उपयोग होऊ शकतो, असे त्यांनी सांगितले.

श्री. रवींद्र फडणवीस यांनीही ॲक्युप्रेशर तसेच कौशल्याधारित अभ्यासक्रमांचे सामाजिक व वैयक्तिक विकासातील महत्त्व स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी आत्मविकासासोबतच आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजाच्या कल्याणासाठी करावा, असे आवाहन त्यांनी केले.

श्री साई समर्थ एज्युकेशन, मेडिकल अँड रिसर्च सोसायटीचे संस्थापक व संचालक श्री. पराग कुळकर्णी आणि पराग कुळकर्णी ॲक्युप्रेशर ट्रीटमेंट सेंटर यांनी विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन केले.

ॲक्युप्रेशर क्षेत्रातील आपल्या प्रवासातील अनुभव त्यांनी विद्यार्थ्यांसमोर मांडले. तसेच ॲक्युप्रेशरचे शिक्षण अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने आणि विशेष गरजा असलेल्या व्यक्तींसाठी विशेष ॲक्युप्रेशर अभ्यासक्रम विकसित करण्याच्या आपल्या संकल्पनेविषयी त्यांनी माहिती दिली.

श्री साई समर्थ एज्युकेशन, मेडिकल अँड रिसर्च सोसायटीच्या सचिव सौ. सारिका कुळकर्णी यांनी ॲक्युप्रेशर अभ्यासक्रमाबाबत महत्त्वाची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, २०२१ पासून आतापर्यंत या अभ्यासक्रमाच्या ७ बॅच पूर्ण झाल्या असून सुमारे २३० विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमात सहभाग घेतला आहे. यापैकी अनेक विद्यार्थी आज ॲक्युप्रेशरचा यशस्वीपणे सराव करून समाजातील नागरिकांच्या आरोग्य सुधारण्यासाठी योगदान देत आहेत.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभिषेक बजाज यांनी केले. सर्व मान्यवरांचे स्वागत भवतीक जोशी यांनी केले, तर आभार शार्दुल तेलंग यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आयोजन समितीतील स्वाती नाचनकर, सायली तेलंग, राघव देशपांडे, सौरभ गौर, सचिन प्रजापती, सुजाता पौनीकर, चंदा बजाज, निकीता मेहर आणि दिशा जोशी यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच PKAT ॲक्युप्रेशर फॅमिली मधील स्वयंसेवक व सर्व सदस्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मोलाचे सहकार्य केले. प्रमाणपत्र वितरणाने विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकास, स्वावलंबन आणि समाजसेवेच्या प्रवासातील एका महत्त्वपूर्ण टप्प्याची नोंद झाली.

वर्षावासाच्या मंगल प्रारंभाला भीम-बुद्ध गीतांची साथ; धानोलीत धम्म, समता अन् प्रबोधनाचा जागर



सेलू / प्रशांत झाडे

धानोली मेघे : वर्षावास प्रारंभानिमित्त भीमाई बुद्ध विहार, धानोली यांच्या वतीने भीम-बुद्ध गीतांचा व प्रबोधनात्मक भजनांचा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. पंचशील भजन मंडळ, धानोली यांच्या उपस्थितीत विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस दीपप्रज्वलन व पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. तसेच तथागत भगवान बुद्ध व महामानवांना अभिवादन करून धम्ममय वातावरणात कार्यक्रमास प्रारंभ झाला.

कार्यक्रमात हार्मोनियम वादक प्रवीण भगत, प्रबोधन गायक प्रतिभा भगत, तबला वादक गजानन तेलंग तसेच दिलीप कुंभलवार, दयाशंकर भगत, गजानन तेलंग तसेच दिलीप कुंभलवार, दयाशंकर भगत, तुळशीदास भगत, मंजुषा भगत, सुहानी भगत, रेखा कांबळे, नम्रता खडसे, अनीता पोहरे, संजना भगत आणि प्रशील रामटेके यांनी भीम-बुद्ध गीत व प्रबोधनात्मक भजने सादर केली. त्यांच्या सादरीकरणातून धम्म, समता, बंधुता, शिक्षण आणि सामाजिक परिवर्तनाचा संदेश देण्यात आला.

वर्षावासाच्या पवित्र पर्वाच्या निमित्ताने आयोजित या कार्यक्रमात भीम-बुद्ध गीतांच्या सुरांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. गीत आणि भजनांच्या माध्यमातून समाजप्रबोधन घडवत बुद्ध-आंबेडकरी विचारांचा जागर करण्यात आला.

यावेळी विभा भगत यांच्यासह परिसरातील अनेक धम्मबंधू-भगिनी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी भीमाई बुद्ध विहाराच्या वतीने सर्वांचे आभार मानण्यात आले.

बाबाराव भुते यांची सिंदी रेल्वे शहर काँग्रेस अध्यक्षपदी नियुक्ती

जिल्हाध्यक्ष सुनील कोल्हे यांनी दिले नियुक्तीपत्र, पक्ष संघटना मजबूत करण्याची जबाबदारी, काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उत्साह

सेलू/ प्रशांत झाडे

सिंदी रेल्व शहरातील काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक बांधणीला नवी दिशा देत राजेश्वर उर्फ बाबाराव लक्ष्मणराव भुते यांची सिंदी रेल्वे शहर काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

वर्धा जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुनील कोल्हे यांनी १० ऑगस्ट २०२६ रोजी भुते यांना अधिकृत नियुक्तीपत्र प्रदान केले. शहरातील काँग्रेस संघटना अधिक मजबूत करणे, कार्यकर्त्यांना एकत्रित करून पक्षाच्या संघटनात्मक कार्याला गती देणे तसेच जनहिताच्या प्रश्नांवर प्रभावीपणे आवाज उठविण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

भुते यांच्या नियुक्तीमुळे सिंदी शहरातील काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली शहर काँग्रेस कमिटीला नवी ऊर्जा मिळेल, असा विश्वास कार्यकर्त्यांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

दरम्यान, माजी नगराध्यक्ष तथा शहर काँग्रेस कमिटीचे मावळते अध्यक्ष प्रकाशचंद्र डफ यांनी बाबाराव भुते यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

तसेच किशोर सोनटक्के, गजानन खंडाळे, संदीप सोनटक्के, अरुण झाडे यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी भुते यांचे अभिनंदन केले.

नव्या जबाबदारीतून सिंदी शहरात काँग्रेसची संघटनात्मक ताकद वाढविण्यासाठी बाबाराव भुते कोणती भूमिका बजावतात, याकडे आता काँग्रेस कार्यकर्त्यांसह राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.



क्रांती दिन निमित्त समर गीत स्पर्धा संपन्न



हिंगणी येथे वन कामगारांचे २१व्या दिवशीही साखळी उपोषण सुरू

मागण्यांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष; न्याय न मिळाल्यास आमरण उपोषणाचा इशारा

सेलू/ प्रशांत झाडे

राष्ट्रीय मजदूर काँग्रेस महाराष्ट्र शाखेच्या वतीने अध्यक्ष भाष्करराव मुडे यांच्या नेतृत्वाखाली हिंगणी येथील बाजार चौकातील वन परिक्षेत्र कार्यालयासमोर गेल्या २० जुलै २०२६ पासून साखळी उपोषण सुरू आहे. आज या उपोषणाचा २१वा दिवस असूनही वन विभागाकडून अद्याप कोणतेही लेखी आश्वासन देण्यात आले नसल्याने उपोषणकर्त्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

दरम्यान, वन विभागाचे रेंजर यांनी उपोषणकर्त्यांची भेट घेऊन त्यांच्या मागण्या वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचे आश्वासन दिले. मात्र, २१ दिवस उलटूनही मागण्यांबाबत कोणतेही लेखी पत्र अथवा ठोस निर्णय घेण्यात आलेला नाही, असा आरोप उपोषणकर्त्यांनी केला आहे.



काही जुने वन कामगारांनी वन विभागात चार ते पाच वर्षे काम करूनही त्यांच्या कामाचा व हक्काचा मोबदला अथवा शासनाच्या नियमानुसार रोजगाराचा अधिकार मिळालेला नसल्याचे सांगितले. कामगारांच्या वयाचा विचार करून त्यांना नोकरीत सामावून घ्यावे, तसेच वयाची ६० वर्षे पूर्ण झालेल्या कामगारांना शासन-प्रशासनाच्या नियमानुसार वेतन अथवा आर्थिक लाभ देण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.तसेच, वयोमानामुळे संबंधित कामगारांना नोकरी देणे शक्य नसल्यास त्यांच्या मुलांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार सरळ नोकरी भरती प्रक्रियेत समाविष्ट करून रोजगाराची संधी द्यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.या साखळी उपोषणासंदर्भात आज १० ऑगस्ट २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाला उप वन संवरक्षक कार्यालय वर्धा यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात हिंगणी येथील १९९४-९५च्या वनपरिक्षेत्रातील एकूण ८७कामगार वणकामगार यादीतील २३आणी एफ डी. सी. एम. चे ११३कामगार अश्या एकूण २२३कामगारांच्या मागण्यांकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने न्यायद्यावा, अशी मागणी करण्यात आली. 'आम्ही ज्या जिल्ह्यात जगत आहोत, तो राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा जिल्हा आहे. येथे आपल्या न्याय्य मागण्यांसाठी वारंवार उपोषण करण्याची वेळ येत असेल आणि उपोषण करूनही न्याय मिळत नसेल, तर येणाऱ्या काळात आम्हाला आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागेल,' असा इशारा उपोषणकर्त्यांनी दिला.

यावेळी हिंगणी येथील संघटनेचे अध्यक्ष भाष्कर मुडे, गुणवंतराव सरवरे शंकरराव दुर्गे, मनोहर पोकळे तसेच सौ. जया कुरुणकर यांनी आपल्या मागण्या प्रशासनासमोर मांडल्या.याच ठिकाणी काम करणारे काही कामगार तत्कालीन वनपरिक्षेत्र अधिकारी खोब्रागडे यांच्या कालखीर्दी मध्ये ९०दिवस काम करूनही २०१५मधल्या काही कामगारांना त्यांच्या कामाचे अजूनही पगार न दिल्याचा आरोपही करण्यात आला या सर्व बाबींची सखोल चौकशी करुन संबंधित उपोषण कर्त्यांना न्याय देण्याची मागणी जिल्हाधिकारी तथा जिल्हा पोलीस अधीक्षक व उपवन संवरक्षक यांना करण्यात आली.

नागपूर / दिलीप वेवले

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ गट कार्यालय २ नागपूर अंतर्गत मा. प्र. सहाय्यक कल्याण आयुक्त श्रीकांत धोत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली क्रांती दिना निमित्त गटस्तरीय समरगीत स्पर्धेचे आयोजन ललित कला भवन विनोबाग्राम येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमाला कार्यक्रमाचे पाहुणे म्हणून दैनिक देशोन्नतीचे पत्रकार यशवंत चोपडे उपस्थित होते. स्पर्धेचे परीक्षण प्रशांत भिंगारे, विनोद लांडगे, ज्योत्स्ना तायडे यांनी केले. स्पर्धेमध्ये एकूण १४ संघानी सहभाग घेतला. स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांकाचा पारितोषिक कामगार कल्याण केंद्र जयताळा, द्वितीय क्रमांक कामगार कल्याण केंद्र खापरखेडा, तृतीय क्रमांक कामगार कल्याण केंद्र कोराडी, गट कार्यालय २ नागपूर अंतर्गत केंद्र व्हेझनबाग व उत्तेजनार्थ द्वितीय कामगार कल्याण केंद्र सावनेर यांना मिळाला. पाहुण्यांच्या हस्ते विजय संघांना पारितोषिक व सन्मानपत्र देऊन गौरवण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कामगार कल्याण अधिकारी छोटू जाधव, संचालन केंद्र संचालक सुधमा खोडे, आभार केंद्र संचालक सतीश कुटे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता सचिन वंजारी, कविता लोखंडे, दर्शन सोमकुवर, अनिल जीवतोडे, प्रमोद निमजे, संदीप विझे, विवेक उदावंत, सुजाता जाधव यांनी सहकार्य केले.

महाराष्ट्राला 'इनोव्हेशन हब' बनविण्यासाठी युवा कल्पनांना व्यासपीठ देण्यात येणार – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

३० नामांकित व्यवस्थापन व सार्वजनिक धोरण संस्थांमधील विद्यार्थी सहभागी

मुंबई : महाराष्ट्राला 'इनोव्हेशन हब' म्हणून विकसित करण्याच्या उद्देशाने प्रशासनासमोरील आव्हानांवर नाविन्यपूर्ण उपाय सुचविण्यासाठी युवा प्रतिभांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात येणार आहे. 'द गव्हर्नन्स चॅलेंज टीजीसी २०२६'च्या चौथ्या पर्वाची राज्य शासनाने घोषणा केली असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

भारतातील राज्य शासन व्यवस्थेवर पहिली राष्ट्रीय प्रशासन केंद्रीत केस स्पर्धा म्हणून आयोजित करण्यात येणाऱ्या या उपक्रमाच्या माध्यमातून देशातील प्रतिभावान युवा विद्यार्थ्यांना महाराष्ट्राच्या नवोन्मेषाच्या भविष्यासाठी नाविन्यपूर्ण उपाय सुचविण्याची संधी मिळणार आहे. राज्य शासनाच्या पुढाकाराने, गेटस फाउंडेशनच्या सहकार्याने आणि समग्र संस्थेच्या आयोजनातून ही स्पर्धा होणार आहे. देशातील ३० नामांकित विद्यापीठांमधील विद्यार्थी यामध्ये सहभागी होणार आहेत. या स्पर्धेत सहभागी विद्यार्थी महाराष्ट्राच्या दीर्घकालीन महत्त्वाच्या प्राधान्यक्रमांपैकी एक असलेल्या महाराष्ट्राला नवोन्मेषाचे प्रमुख केंद्र बनविण्यासाठी उपाययोजना आणि प्रभावी सूचना सुचविणार आहेत. क्षेत्रनिहाय उपाययोजना विकसित करण्यासाठी सहभागी संघांना आरोग्य, कृषी, नागरी विकास, वित्तीय समावेशन, शासन आणि शिक्षण या सहा प्राधान्य क्षेत्रांपैकी एका क्षेत्राची निवड करावी लागणार आहे.

नवोन्मेषाच्या क्षेत्रात महाराष्ट्राची वाटचाल

विकसित भारत २०४७चे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी जटिल विकासविषयक आकांनांवर उपाय शोधणारे, उत्पादकता वाढविणारे आणि नव्या आर्थिक संधी निर्माण करणारे नवोन्मेष आवश्यक आहेत. देशातील सर्वांत मोठ्या राज्य अर्थव्यवस्थांपैकी एक असलेले महाराष्ट्र मजबूत औद्योगिक पाया, सक्षम वित्तीय परिसंस्था, जागतिक दर्जाच्या शैक्षणिक संस्था, विकसित होत असलेली स्टार्टअप परिसंस्था आणि उद्योजकतेची संस्कृती यामुळे या परिवर्तनाचे नेतृत्व करण्यासाठी सक्षम आहे. राज्यातील नवोन्मेष परिसंस्था अधिक मजबूत करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने अनेक महत्त्वपूर्ण पाचले उचलली आहेत. महाराष्ट्र स्टार्टअप, उद्योजकता आणि नवोन्मेष धोरण २०२५ अंतर्गत पुढील पाच वर्षांत ५० हजार स्टार्टअपना मान्यता देणे आणि १.२५ लाख उद्योजकांना प्रोत्साहन देणे, हे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्य नवोन्मेष सोसायटी, ?५०० कोटींचा मुख्यमंत्री महाफंड, नवी मुंबईतील प्रस्तावित महाराष्ट्र इनोव्हेशन सिटी, तसेच आर्टिफिशियल इंटेलिजन्स, ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर्स आणि मानवरहित प्रणालींसाठीच्या स्वतंत्र राज्य धोरणांमुळे नवोन्मेषाधारित विकासासाठी भक्कम पायाभूत व्यवस्था निर्माण होत आहे. 'विकसित महाराष्ट्र २०४७'च्या व्यापक दृष्टिकोनाला पुढे नेत टीजीसी २०२६च्या माध्यमातून देशातील युवा प्रतिभांची सर्जनशीलता, विश्लेषणात्मक क्षमता आणि नाविन्यपूर्ण दृष्टिकोन यांचा उपयोग करून महाराष्ट्राच्या नवोन्मेषाच्या वाटचालीला अधिक वेग देणाऱ्या धाडसी आणि परिणामकारक कल्पना शोधण्यात येणार आहेत.



तीन टप्प्यांत होणार स्पर्धा

'द गव्हर्नन्स चॅलेंज २०२६' ही स्पर्धा दोन महिन्यांच्या कालावधीत तीन टप्प्यांत होणार आहे.

कॅम्पस राउंड : सहभागी ३० संस्थांमधील विद्यार्थी संघ आपले प्रोजेक्ट सादर करतील. त्यांचे मूल्यांकन झाल्यानंतर प्रत्येक संस्थेतील एक विजेता संघ पुढील टप्प्यासाठी पात्र ठरेल.

नॅशनल्स राउंड – ११ व १२ सप्टेंबर २०२६ : ३० कॅम्पस विजेते संघ वरिष्ठ सनदी अधिकारी आणि उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांच्या परीक्षक मंडळासमोर ऑनलाइन पद्धतीने आपले प्रोजेक्ट सादर करतील. त्यातून सहा अंतिम संघांची निवड करण्यात येईल.

समिट राउंड– २८ ते ३० सप्टेंबर २०२६ : सहा अंतिम संघ महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर आपल्या शिफारसी सादर करतील.

अंतिम संघांसाठी महाराष्ट्रात दोन दिवसीय विशेष 'गव्हर्नन्स इमर्शन व्हिजिट' आयोजित करण्यात येणार असून, त्याद्वारे त्यांना शासन व्यवस्था आणि योजनांच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीचा अनुभव घेता येईल.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, 'उद्योग, उद्योजकता, वित्त आणि तंत्रज्ञान यासारख्या क्षेत्रात महाराष्ट्राने नेहमीच देशाचे नेतृत्व केले आहे. मात्र, महाराष्ट्राला भारताची नवोन्मेषाची राजधानी आणि जगातील आघाडीच्या नवोन्मेष केंद्रांपैकी एक बनविण्याचे आमचे उद्दिष्ट आहे.

यासाठी देशातील तज्ज्ञांची युवा प्रतिभांच्या धाडसी कल्पना, नवे दृष्टिकोन आणि सर्जनशीलतेची गरज आहे. 'द गव्हर्नन्स चॅलेंज'च्या अंतिम फेरीतील सर्वोत्तम सहा संघांची मुंबईत सहभागी होणार आहेत.

समग्रचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव गोयल म्हणाले की, 'द गव्हर्नन्स चॅलेंज' ही केवळ शासन व्यवस्थेला समर्पित भारतातील पहिली राष्ट्रीय स्पर्धा आहे.

देशातील प्रतिभावान पदव्युत्तर विद्यार्थ्यांना सार्वजनिक धोरण आणि शासनविषयक आव्हानांशी सखोलपणे जोडणे हा या स्पर्धेचा उद्देश आहे. सरकारी नेतृत्व आणि क्षेत्रातील तज्ज्ञांसोबत प्रत्यक्ष समस्यांवर काम करण्यामुळे सहभागी विद्यार्थ्यांना राष्ट्रनिर्मितीत अर्थपूर्ण योगदान देण्याची तसेच मोठ्या प्रमाणावर परिणाम घडवून आणणारे व्यावहारिक उपाय विकसित करण्याची अनोखी संधी मिळणार आहे.

'द गव्हर्नन्स चॅलेंज २०२६'चे चौथे पर्व घोषित
आरोग्य, कृषी, शहरी विकासासह सहा क्षेत्रांवर उपाय सुचविणार

प्रहारला आर्वीत मोठा धक्का! जयकुमार बेलखडे यांचा राजीनामा; राजकीय वर्तुळात खळबळ

कारंजा शहरातील कार्यक्रमातील नाराजीतून प्रहारला रामराम; राजीनाम्यानंतर लागलीच पत्रपरिषदेत भूमिकेचे दिले संकेत

कारंजा / प्रतिनिधी

आर्वी विधानसभा क्षेत्रात प्रहार जनशक्ती पक्षाला मोठा राजकीय धक्का बसला असून, संघटनेचे आक्रमक नेतृत्व आणि माजी विधानसभा प्रमुख जयकुमार बेलखडे यांनी आपल्या पदाचा तडकाफडकी राजीनामा दिला आहे. राजीनाम्याची शाई वाळते न वाळते तोच, बेलखडे यांनी कारंजा येथील शासकीय विश्रामगृहावर घेतलेल्या राजकीय भेटीगाठींमुळे आणि त्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेमुळे राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. या घडामोडींनंतर कारंजा आणि संपूर्ण आर्वी परिसरातील राजकीय गोटात विविध चर्चा आणि नव्या समीकरणांचे उधाण आले आहे.



?हे विशेष म्हणजे, जयकुमार बेलखडे यांच्या या तडकाफडकी राजीनाम्यामागे पक्षांतर्गत नाराजी हेच मुख्य कारण असल्याचे बोलले जात आहे. आज आर्वी विधानसभेतील कारंजा शहरात सत्ताधारी शिवसेनेच्या वतीने आयोजित करण्यात आलेला पक्षप्रवेश सोहळा, लोकार्पण सोहळा आणि भव्य कार्यकर्ता मेळावा या कार्यक्रमाला प्रहारचे संस्थापक अध्यक्ष तथा शिवसेनेचे विधान परिषद आमदार मा. ना. श्री. बच्चू कडू हे स्वतः उपस्थित होते. स्थानिक पातळीवरील या राजकीय घडामोडींमध्ये आणि कार्यक्रमात विश्वासात न घेतल्याने तसेच डावलले गेल्याची भावना निर्माण झाल्यामुळेच जयकुमार बेलखडे हे प्रचंड नाराज असल्याचे वृत्त आहे. याच तीव्र नाराजीतून त्यांनी तात्काळ पदाचा त्याग करण्याचा मार्ग निवडल्याची जोरदार चर्चा रंगली आहे.

?कारंजा येथील शासकीय विश्रामगृहावर आज राजकीय भेटीगाठी पार पडल्यानंतर, पत्रपरिषदेत बोलताना जयकुमार बेलखडे यांनी आपण लवकरच पुढील राजकीय भूमिका स्पष्ट करणार असल्याचे सांगितले. गेल्या अनेक वर्षांपासून आर्वी मतदारसंघात शेतकरी, कष्टकरी, मजूर आणि दिव्यांगांच्या विविध प्रश्नांवर आक्रमकपणे लढा देणारे जयकुमार बेलखडे यांनी पक्षश्रेष्ठींकडे पाठवलेल्या पत्रात जरी वाढत्या वैयक्तिक व्यापांचे कारण दिले असले, तरी कारंजा शहरातील पत्रकार परिषदेत दिलेल्या संकेतानुसार हा राजीनामा वैयक्तिक नसून मोठ्या राजकीय पक्षांतराची पूर्वतयारी असल्याचे स्पष्ट दिसत आहे.

?या अचानक झालेल्या घडामोडींमुळे जयकुमार बेलखडे काँग्रेस पक्षाचा झेंडा हातात घेणार की महाविकास आघाडीच्या स्थानिक समीकरणांनुसार शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाची 'मशाल' पेटवून मैदानात उतरणार, याकडे आता संपूर्ण राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

?जयकुमार बेलखडे यांच्या या निर्णयामुळे आर्वी तालुक्यातील राजकीय चित्र वेगाने बदलू लागले आहे. ऐन मोक्याच्या वेळीच प्रहारच्या प्रमुख शिलेदाराने रामराम ठोकल्यामुळे प्रहार संघटनेसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. बेलखडे लवकरच अधिकृतपणे कोणत्या पक्षात प्रवेश करतात, 'मशाल' हाती घेतात की 'कंप्रिसचा झेंडा' खांद्यावर देतात, आणि या मोठ्या फुटीनंतर प्रहार संघटना आपली पकड मजबूत ठेवण्यासाठी काय पावले उचलते, याकडे संपूर्ण वर्धा जिल्ह्याचे बारीक लक्ष लागून राहिले आहे.

जंगल वाचविणारा वनरक्षकच किती सुरक्षित ?

वाघ, बिबट्या अन् वन्यजीवांच्या हालचालींमध्ये वनरक्षकांची धावपळ; अत्याधुनिक सुरक्षा साधनांसह पुरेसे मनुष्यबळ देण्याची गरज

आष्टी / प्रतिनिधी

जंगलातील वन्यजीवांचे संरक्षण करणे, त्यांचा अधिवास सुरक्षित ठेवणे आणि मानव-वन्यजीव संघर्ष टाळणे ही जबाबदारी वन विभागाच्या वनरक्षकांच्या खांद्यावर असते. मात्र, ज्या वनरक्षकांच्या जीवावर जंगल आणि वन्यजीवांचे रक्षण करण्याची जबाबदारी आहे, त्या वनरक्षकांच्या सुरक्षेचे काय ? असा गंभीर प्रश्न आता उपस्थित होत आहे.

वाघ, बिबट्या, अस्वल यांसारख्या वन्यप्राण्यांचा वावर असलेल्या भागात वनरक्षकांना अनेकदा दिवस-रात्र गस्त घालावी लागते. वन्यजीवांच्या हालचालींची माहिती मिळाल्यानंतर नागरिकांना सतर्क करणे, घटनास्थळी पोहोचणे, पंचनामा करणे, जखमी अथवा मृत जनावरांची पाहणी करणे आणि वन्यजीवांच्या हालचालींवर लक्ष ठेवणे अशी अनेक धोकादायक कामे त्यांना करावी लागतात.

रात्रीची गस्त म्हणजे जीव मुठीत घेऊन कर्तव्य!

वन्यजीवांची हालचाल प्रामुख्याने रात्री वाढते. अशा वेळी वनरक्षकांना अंधारात जंगल, शेतशिवार आणि गावालगतच्या परिसरात गस्त घालावी लागते. अनेक ठिकाणी अपुरी प्रकाशव्यवस्था, मर्यादित मनुष्यबळ आणि आवश्यक सुरक्षा साधनांचा अभाव असल्यास परिस्थिती आणखी धोकादायक बनते.

एखादा वाघ किंवा बिबट्या गावाच्या दिशेने आल्याची माहिती मिळाल्यानंतर सर्वप्रथम नागरिकांना सुरक्षिततेसाठी धाव घेणारा वनरक्षकच असतो. मात्र, अशा प्रसंगी त्याच्यासोबत पुरेसे कर्मचारी, सुरक्षित वाहन आणि आवश्यक उपकरणे आहेत का, हा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे.



वन्यजीवांच्या सुरक्षेची जबाबदारी खांद्यावर; मात्र रात्रीच्या गस्तीवेळी अपुऱ्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न

वन्यजीव वाचवताना वनरक्षकांचा जीव धोक्यात

वन्यप्राण्यांपासून नागरिकांचे संरक्षण करणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच वन्यजीवांचे संरक्षण करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या जीवितासाठी काळजी घेणेही प्रशासनाची जबाबदारी आहे.

वाघाचा मागे काढणे, कॅमेरा ट्रॅप लावणे, वन्यजीवांच्या हालचाली तपासणे किंवा रात्रीच्या वेळी संवेदनशील परिसरात गस्त घालणे ही कामे अत्यंत जोखमीची आहेत. त्यामुळे वनरक्षकांना केवळ आदेश देऊन चालणार नाही; त्यांना आवश्यक प्रशिक्षण, सुरक्षा साहित्य आणि पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

'वनरक्षक सुरक्षित तरच जंगल सुरक्षित!'

वनरक्षकांसाठी संरक्षणात्मक जॅकेट, मजबूत टॉर्च, वायरलेस संपर्क व्यवस्था, उड्डण सुविधा, सुरक्षित वाहने आणि आवश्यक प्रथमोपचार साहित्य उपलब्ध करून देण्याची गरज आहे.

तसेच संवेदनशील भागात रात्रीची गस्त एकट्याने न देता पुरेशा कर्मचाऱ्यांच्या पथकाद्वारे करण्याची आवश्यकता आहे.

मानव-वन्यजीव संघर्षाच्या घटना वाढत असताना वन विभागाच्या तळागाळातील कर्मचाऱ्यांवरील जबाबदारीही वाढत आहे. त्यामुळे 'वन्यजीवांचे रक्षण करणारा वनरक्षक सुरक्षित आहे का?' या प्रश्नाचे उत्तर प्रशासनाने गांभीर्याने शोधण्याची वेळ आली आहे.

जंगल वाचविणाऱ्या हातांना सुरक्षा कवच द्या !

वन्यजीवांचे संरक्षण करणाऱ्या वनरक्षकांना धोक्यात टाकून जंगलाचे संरक्षण प्रभावीपणे होऊ शकत नाही. वनरक्षकांच्या सुरक्षेला प्राधान्य देत त्यांना आधुनिक साधने, पुरेसे मनुष्यबळ, सुरक्षित वाहने आणि आवश्यक प्रशिक्षण देण्यात यावे, अशी मागणी वन्यजीवप्रेमी आणि नागरिकांकडून होत आहे.

जंगल सुरक्षित ठेवायचे असेल, तर जंगलाच्या पहाऱ्यावर उभा असलेला वनरक्षकही सुरक्षित असायलाच हवा!

विषारी औषध प्राशन केल्याने पत्नीचा मृत्यू, पती रुग्णालयात ; पिंपळगाव (भोसले) येथील घटना

वर्धा : वृद्ध दाम्पत्याने विषारी प्राशन केल्याची घटना पिंपळगाव(भोसले) येथे घडली. या घटनेत पत्नीचा मृत्यू झाला असून पतीवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी खरांगणा (मोरांगणा) पोलिसांनी नोंद केली.

सावित्राबाई दुलीचंद धुर्वे (वय ७०) असे मृत महिलेचे नाव आहे. आर्वी तालुक्यातील पिंपळगाव (भोसले) परिसरातील एका शेतातमध्ये सावित्राबाई धुर्वे आणि पती दुलीचंद धुर्वे (वय ७५) हे दोघे राहतात. रविवारी रात्री दोघांमध्ये कोणत्या तरी कारणावरून वाद झाला. सोमवारी, १० ऑगस्ट रोजी सावित्राबाई धुर्वे मृतावस्थेत आढळून आल्या. यादरम्यान दुलीचंद यांनीही विषारी औषध प्राशन केले. ही बाब लक्षात येताच ग्रामस्थ आणि नातेवाईकांनी दोघांना तातडीने रुग्णालयात दाखल केले. तेथे डॉक्टरांनी सावित्राबाई धुर्वे यांना तपासणीअंती मृत घोषित केले. दुलीचंद धुर्वे यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहे. या याप्रकरणी खरांगणा (मोरांगणा) पोलिसांनी नोंद केली.

जंगलाचा राजा गावात; आष्टीकरांच्या काळजाचा ठोका वाढला!

अंधारात आष्टी-वरुड मार्गावर नागरिकांची शतपावली; पथदिवे बंद, नगरपंचायत व महामार्ग प्राधिकरण झोपेत? वाघाच्या वावराचे व्हिडिओ व्हॉट्सॲपवर व्हायरल; वन विभागाने रात्रगस्त वाढविण्याची नागरिकांची मागणी

आष्टी (शहीद) : जंगलाचा राजा वाघ आता शहराच्या उंबरठ्यावर येऊन पोहोचल्याची चर्चा सुरू झाली असून, वाघाच्या वावराचे व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात प्रसारित होत असल्याने आष्टी शहरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे, ज्या भागात वन्यजीवांच्या हालचालींचे व्हिडिओ समोर येत आहेत, त्याच परिसरातून नागरिक सायंकाळी शतपावलीसाठी ये-जा करीत असतात. मात्र, आष्टी-वरुड मार्गावर पथदिवे बंद असल्याने अंधारात नागरिकांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

गर्द अंधारात शतपावली; धोका कुणाला?

आष्टी शहरातील अनेक नागरिक रात्रीच्या वेळी शतपावलीसाठी आष्टी-वरुड मार्गाचा वापर करतात. मात्र, या मार्गावरील बहुतांश पथदिवे बंद असल्याने रात्रीच्या वेळी गर्द अंधाराचे साम्राज्य असते.

एकीकडे बाधासह अन्य वन्यजीवांच्या हालचालींबाबत व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित होत आहेत, तर दुसरीकडे नागरिक त्याच मार्गावर अंधारात फिरत आहेत. त्यामुळे वन्यजीव आणि नागरिक यांच्यात अचानक सामना झाल्यास मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

लाखो रुपयांचे पथदिवे शोभेपुरते?

आष्टी शहरातून जाणाऱ्या महामार्गावर महामार्ग प्राधिकरणाकडून पथदिवे बसविण्यात आले होते. सुरुवातीला काळात हे पथदिवे व्यवस्थित सुरू होते. मात्र, संबंधित कंत्राटदाराचा कालावधी संपल्यानंतर पथदिव्यांची अवस्था शोभेच्या वस्तूसारखी झाली असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

पथदिवे सुरू करण्यासाठी नागरिकांनी यापूर्वी अनेक निवेदने देऊन तसेच मोर्चे काढून प्रशासनाचे लक्ष वेधले. मात्र, अद्यापही समस्या कायम असल्याने नगरपंचायत प्रशासन आणि महामार्ग प्राधिकरण नेमके कोणाची वाट पाहत आहे? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.



'पथदिवे सुरू करा, रात्रगस्त वाढवा!'

बाधाच्या वावराची चर्चा आणि सोशल मीडियावर प्रसारित होणाऱ्या व्हिडिओंची गंभीर दखल घेऊन वन विभागाने आष्टी शहर व लगतच्या परिसरात रात्रगस्त वाढविण्याची गरज निर्माण झाली आहे.

जंगलातून शहराच्या दिशेने येणाऱ्या वन्यजीवांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी वन विभागाने संवेदनशील भागात नियमित गस्त घालावी. तसेच नागरिकांना वन्यजीव दिसल्यास त्याच्या जवळ न जाता तातडीने वन विभागाला माहिती देण्याचे आवाहन करावे, अशी मागणी होत आहे.

प्रशासन जागे होणार कधी?

एकीकडे वाघाच्या वावराची भीती, दुसरीकडे महामार्गावर काळोख आणि तिसरीकडे नागरिकांची रात्रीची शतपावली... तरीही प्रशासनाचे डोळे उघडणार कधी? असा संतप्त सवाल आष्टीकरांकडून उपस्थित केला जात आहे.

नगरपंचायत प्रशासन आणि महामार्ग प्राधिकरणने एकमेकांकडे बोट न दाखवता आष्टी-वरुड मार्गावरील बंद पथदिवे तातडीने सुरू करावेत, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

'उद्या दुर्घटना घडण्याची वाट पाहू नका!'

वन्यजीवांच्या संभाव्य धोक्यावावत प्रशासनाने केवळ सोशल मीडियावरील व्हिडिओ म्हणून दुर्लक्ष न करता वन विभागाने तातडीने या परिसराची पाहणी करून वाघाच्या हालचालींची खातरजमा करावी. आष्टी शहर व आष्टी-वरुड मार्गालगतच्या संवेदनशील भागात वन विभागाची रात्रगस्त वाढवावी, वन्यजीवांच्या हालचालींवर लक्ष ठेवावे आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात.

त्याचबरोबर नगरपंचायत प्रशासन व महामार्ग प्राधिकरणाने बंद असलेले पथदिवे तातडीने सुरू करावेत. वाघ शहराच्या उंबरठ्यावर येईपर्यंत किंवा एखादी दुर्घटना घडेपर्यंत प्रशासनाने वाट पाहू नये. नागरिकांच्या जीवितासाठी सुरक्षितता लक्षात घेऊन नगरपंचायत, महामार्ग प्राधिकरण आणि वन विभागाने समन्वयाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी आष्टीकरांकडून होत आहे.